# पुढच्या वर्षी गणपती बाप्पा लवकर येणार!



**मुंबई** : विधीवत पूजा-अर्चा आणि सेवा केल्यानंतर गणपती बाप्पाला शुक्रवारी (दि.२५) निरोप दिला जाणार आहे. यंदा गणेशोत्सवाची सुरुवात धुमधडाक्यात झाली. १४ सप्टेंबर गणेशचतुर्थीला बाप्पा घराघरात आणि मंडपात विराजमान झाले. त्यानंतर आधी दीड दिवसांच्या बाप्पांनी निरोप घेतला. काही दिवसांपूर्वी सात दिवसांच्या बाप्पांचे विसर्जन करण्यात आले होते. आता शुक्रवारी अनंत चतुर्दशी आहे. अकरा दिवसांच्या पाहुणचारानंतर बाप्पा निरोप घेणार आहेत. अशावेळी भक्त बाप्पांना पुढच्या वर्षी लवकर या अशी साद घालत असतात. ही साद बाप्पांनी ऐकली असून ते पुढच्या वर्षी लवकर येणार आहेत. पुढील वर्षी गणेश चतुर्थी ४ सप्टेंबर रोजी आहे. त्यामुळे यंदाच्या तारखेशी तुलना करता पुढच्या वर्षी गणपतीचे आगमन हे दहा दिवस आधीच आहे. म्हणून भाविकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.


रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १९ ◆ अंक ६९
www.ramprahar.com

◆ शुक्रवार, २५ सप्टेंबर २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२


## अंतरंग


खासगी बस जळून खाक; सुदैवाने प्रवासी सुरक्षित/२

गणेशोत्सवात शासकीय योजनांचा 'लोकसंवाद'/४

माणगाव, नेरळ, नागोठण्यात गढूळ पाण्याचा पुरवठा/७


# दुष्काळाचा जीआर आज निघणार

## ■ मुख्यमंत्र्यांकडून सलग दुसऱ्या दिवशी पाहणी

**वाशिम : प्रतिनिधी**

"कोरडा दुष्काळ जाहीर करण्यासंदर्भातील शासन निर्णय उद्याच काढणार", अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी (दि.२४) केली. त्याचबरोबर पिक विम्याचे पैसे शेतकऱ्यांना मिळवून दिले जातील, असेही ते म्हणाले. मुख्यमंत्र्यांनी सलग दुसऱ्या दिवशी विविध दुष्काळसदृश्य भागांना भेटी देत पाहणी केली आणि शेतकऱ्यांच्या समस्या जाणून घेतल्या.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी वाशिम जिल्ह्याच्या कारंजा तालुक्यातील म्हसला, मंगळूरपीर तालुक्यातील मोहगव्हाण आणि मालेगाव तालुक्यातील जऊळका या गावांना भेटी दिल्या. यावेळी त्यांनी शेतकरी बांधवांशी संवाद साधून त्यांच्या व्यथा जाणून घेतल्या. ते म्हणाले, कमी पर्जन्यमानामुळे सोयाबीन, तूर आदी पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांवर हे मोठे संकट आहे. तथापि, खचून जाऊ नये. शासन शेतकऱ्यांसोबत आहे. त्यांना जास्तीत जास्त मदत करण्यात येईल.

"सरकारने कर्जमाफी सुरू केलेली आहे. ती पूर्ण केली जाईल. विजेचे बिल माफ केले आहे, पण आता शेतकऱ्याला थेट मदतीची गरज आहे. त्यामुळे थेट शेतकऱ्याच्या खात्यात मदत करणे असेल, पिण्याच्या पाण्याचा प्रश्न, चाऱ्याचा प्रश्न असेल, काही ठिकाणी मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न निर्माण होईल, त्यात मदत केली जाईल. अन्नधान्याच्या प्रश्नातही मदत केली जाईल", असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

या दौऱ्यात खासदार संजय देशमुख, अनुप धोत्रे, आमदार बाबुसिंग महाराज, सई डहाके, श्याम खोडे, रणधीर सावरकर, भावना गवळी, जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर, मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चव्हाण यांच्यासह प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी, लोकप्रतिनिधी, संबंधित विभागाचे अधिकारी आणि शेतकरी उपस्थित होते.

### दिवाळीपूर्वी मदत देण्याचे नियोजन

"सर्वदूर पिकांची परिस्थिती सारखीच असल्यामुळे राज्य शासनाने मदतीचे धोरण आखले आहे. शेतकऱ्यांना करण्यात येणारी ही मदत दिवाळीपूर्वी मिळेल याचे नियोजन केले जाईल. राज्य शासनाने कर्जमाफी केली असून कर्जाची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होत आहे. कर्जमाफी मिळालेल्या शेतकऱ्यांना बँकांना नियमाप्रमाणे कर्ज द्यावेच लागेल. अतिशय अडचणीची परिस्थिती आलेली आहे. त्यामुळे कोणत्याही बँकांना वसूली करू देणार नाही. कर्जाच्या वसुलीला पूर्णपणे स्थगिती देऊ. पिक विमा कंपन्यांना आम्ही सरळ करू आणि त्यांच्याकडून पूर्ण पैसा मिळवू. याशिवाय शेतमालाची शासकीय दराने खरेदी केली जाईल. यासाठी लवकरच नोंदणी सुरू केली जाईल," असे आश्वासन मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी शेतकऱ्यांना दिले.

## पनवेलचा वरदविनायक



**नवीन पनवेल** : भाजपचे प्रदेश चिटणीस आमदार प्रशांत ठाकूर यांनी पनवेलचा वरदविनायक मित्र मंडळाच्या गणरायाचे दर्शन घेतले. मंडळाच्या वतीने त्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी नगरसेवक संतोष शेट्टी, दशरथ म्हात्रे, नगरसेविका ॲड. प्रतिभा भोईर यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक उपस्थित होते.

## भाजपकडून संघटनात्मक नियुक्त्या जाहीर

**मुंबई : प्रतिनिधी**



भाजपने राष्ट्रीय पातळीवर संघटनात्मक फेरबदल करत विविध राज्यांसाठी नव्या नियुक्त्या जाहीर केल्या आहेत. पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीन यांच्या मंजुरीने झालेल्या या नियुक्त्यांमध्ये ज्येष्ठ नेते शिवप्रकाश यांच्याकडे महाराष्ट्रासह पाच राज्यांची सह महामंत्री (संघटन) म्हणून जबाबदारी देण्यात आली आहे.

अजय जामवाल यांची महाराष्ट्राच्या प्रदेश महासचिव (संघटन)पदी नियुक्ती करण्यात आली आहे. सतीश धोंड यांच्याकडे प्रदेश सह महामंत्री (संघटन) पदासह चार राज्यांतील जनजाती संपर्काची जबाबदारी सोपवण्यात आली आहे.

शिवप्रकाश यांच्याकडे राष्ट्रीय सह महामंत्री (संघटन) पदाची जबाबदारी कायम ठेवण्यात आली आहे. महाराष्ट्राव्यतिरिक्त आंध्र प्रदेश, मध्य प्रदेश, छत्तीसगड आणि गोवा या राज्यांची त्यांच्याकडे धुरा असेल. त्यांचे केंद्रीय कार्यक्षेत्र मुंबई आहे, तर अजय जामवाल यांची प्रदेश महासचिव (संघटन) महाराष्ट्र या पदावर नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांचे केंद्रीय कार्यक्षेत्रही मुंबई राहणार आहे.

सतीश धोंड यांची प्रदेश सह महामंत्री (संघटन) महाराष्ट्र या पदावर नियुक्ती करण्यात आली आहे. त्याचबरोबर गुजरात, मध्य प्रदेश, राजस्थान आणि महाराष्ट्र या चार राज्यांतील जनजाति संपर्काची जबाबदारीही त्यांच्याकडे देण्यात आली आहे. त्यांचे कार्यक्षेत्र नागपूर निश्चित करण्यात आले आहे.

## चिरनेर जंगल सत्याग्रहाचा आज ९६वा हुतात्मा स्मृतिदिन

**उरण : प्रतिनिधी**

स्वातंत्र्य संग्रामात २५ सप्टेंबर १९३० रोजी ज्या देशभक्तांनी आपल्या प्राणाची आहुती देऊन चिरनेर अक्कादेवीच्या जंगलात इतिहास घडविला, त्या आठ हुतात्म्यांची स्मृती जागविण्यासाठी ९६वा स्मृतीदिन कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

जंगल सत्याग्रहातील आंदोलकांवर जुलमी ब्रिटिश सरकारने बेछूट गोळीबार केला होता. यात धाकू गवत्या फोफेरकर, नाग्या महादू कातकरी (चिरनेर), आलू बेमट्या म्हात्रे (दिघोडे), आनंदा माया पाटील, (धाकटी जुई), रामा बामा कोळी (मोठी जुई), रघुनाथ मोरेश्वर शिंदे (कोप्रोली), परशुराम रामा पाटील (पाणदिवे) आणि हसुराम बुधाजी घरत (खोपटे) या आठ सत्याग्रहींनी आपल्या प्राणाची आहुती दिली तसेच यामध्ये ३८ आंदोलक जखमी झाले होते.

## बेलापूरमध्ये पारसिक हिलवरून कार थेट रेल्वे रूळावर कोसळली

### ■ तरुण गंभीर जखमी; लोकल सेवा विस्कळीत

**नवी मुंबई : वार्ताहर**

नवी मुंबईतील बेलापूर येथील पारसिक हिल डोंगरावरून एक कार थेट रेल्वे रुळावर कोसळल्याची घटना गुरुवारी (दि.२५) दुपारी घडली. या अपघातात कारमधील १७ वर्षीय तरुण गंभीर जखमी झाला असून हार्बर मार्गावरची लोकलसेवाही विस्कळीत झाली.

बेलापूर रेल्वेस्थानकाजवळ असलेल्या पारसिक हिल बोगद्याच्या पुढील बाजूला ही कार उंचावरून थेट रुळावर कोसळली. कार बेलापूर-उरण मार्गिकेवर पडल्याने या मार्गावरील रेल्वे सेवा काळ ठप्प झाली. अपघाताची माहिती मिळताच रेल्वे पोलीस आणि अग्निशमन दलाचे पथक घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी रुळावर पडलेली कार बाजूला करण्याचे काम हाती घेतले, तर गंभीर जखमी तरुणाला रुग्णालयात दाखल करण्यात आले.

## निवडक

### बसला आग; नऊ जणांचा मृत्यू

**ग्रेटर नोएडा** : उत्तर प्रदेशातील ग्रेटर नोएडात यमुना एक्सप्रेस वेवर बुधवारी रात्री ११च्या सुमारास स्लीपर बसला आग लागून किमान नऊ प्रवाशांचा मृत्यू झाला. ही बस नवी दिल्लीतील काश्मिरी गेटवरून महोबाच्या दिशेने जात असताना जेवर हद्दीत दयानातपूर गावाजवळ दुर्घटना घडली.

### भिंत कोसळून तिघांचा मृत्यू

**वाडा** : पालघर जिल्ह्यातील वाडा परिसरात असलेल्या टिना रबर कंपनीच्या स्टोअररूमची भिंत गुरुवारी (दि.२४) सकाळी कोसळून दोन महिलांसह तीन कामगारांचा मृत्यू झाला. कामगार नाश्ता करत असताना अचानक भिंत कोसळल्याने ते ढिगाऱ्याखाली अडकले. या दुर्घटनेत त्यांचा जागीच मृत्यू झाला.



**उलवे नोड** : डॉ. अस्मिता म्हात्रे भगत यांच्या मल्टीस्पेशालिटी डेंटल क्लिनिकचे उद्घाटन राज्याचे कॅबिनेट मंत्री गणेश नाईक यांच्या हस्ते गुरुवारी करण्यात आले. यावेळी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे, नगरसेवक परेश ठाकूर, युवा नेते प्रितम म्हात्रे, अतुल पाटील, शकुंतला ठाकूर, संजय भगत आदी उपस्थित होते. मान्यवरांनी डॉ. अस्मिता म्हात्रे भगत यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.




### राम प्रहर — शनिवारचा अंक नाही

अनंत चतुर्दशीनिमित्त 'राम प्रहर'च्या कार्यालयास शुक्रवारी सुट्टी असल्यामुळे शनिवार (दि. २६)चा अंक प्रसिद्ध होणार नाही. याची वाचक, जाहिरातदार, वितरक, एजंट, प्रतिनिधी व हितचिंतकांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक


## दै. रामप्रहर दिवाळी अंक २०२६

### पिढ्यांच्या पाऊलखुणा...

दिवाळी अंकांना महाराष्ट्राच्या साहित्य आणि सांस्कृतिक विश्वात समृद्ध परंपरा लाभली आहे. 'रामप्रहर'नेही ही परंपरा सातत्याने जपली आहे. यंदाच्या दिवाळी अंकासाठी विविध क्षेत्रातील पिढ्यांचा प्रवास हा विषय घेण्यात आला आहे. या मुख्य विषयासोबतच अंकात कथा, कविता, व्यंगचित्रे, लेख, ललित लेखन अशा विविध साहित्यप्रकारांचा समावेश करण्यात येणार आहे. त्यामुळे लेखनाची आवड असलेल्या साहित्यिक, लेखकांना या दिवाळी अंकाच्या माध्यमातून आपले साहित्य वाचकांपर्यंत पोहचवण्याची संधी मिळणार आहे. प्राप्त साहित्याचा यथायोग्य विचार करून दिवाळी अंकासाठी निवड करण्यात येईल.

आपले साहित्य ७ ऑक्टोबरपर्यंत टाइप करून ramprahar@gmail.com या ई-मेलवर पाठवावे.


# आंतरमहाविद्यालयीन वादविवाद स्पर्धेत बीसीटी लॉ कॉलेजला उपविजेतेपद

## ■ लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडून अभिनंदन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनी येथील भागुबाई चांगु ठाकूर (बीसीटी) विधी महाविद्यालयातील दोन विद्यार्थिनींनी टिळक महाराष्ट्र विद्यापीठ आयोजित ज्युरिस्ट वोक्स आंतरमहाविद्यालयीन वादविवाद स्पर्धेचे उपविजेतेपद पटकाविले. या यशाबद्दल संस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी यशस्वी विद्यार्थिनींचे अभिनंदन केले.

बीसीटी लॉ कॉलेजमधील तृतीय वर्ष बीएएलएलबीच्या विद्यार्थिनी वैदेही वेअर आणि दिप्ती गायकवाड यांनी वादविवाद स्पर्धेत उपविजेतेपदाला गवसणी घातली. आत्मविश्वासपूर्ण सादरीकरण, प्रभावी वक्तृत्व आणि कायदेविषयक ज्ञानातून त्यांच्या दमदार कामगिरीची झलक दिसून आली. लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी त्यांचे कौतुक केले.

यावेळी संस्थेचे सदस्य ॲड. राहुल घरत, महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. सानावी देशमुख, बीएएलएलबी समन्वयक प्रा. धनश्री चौगुले, वादविवाद समितीच्या प्रभारी सहायक प्राध्यापिका प्रा. शिल्पा राठोड उपस्थित होते. सर्वांनी वैदेही आणि दिप्ती यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# श्री गणेशा आरोग्याचा अभियान अंतर्गत ४३ हजार लाभार्थ्यांची रायगडात तपासणी

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

मुख्यमंत्री सहायता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष, रायगड यांच्या वतीने 'श्री गणेशा आरोग्याचा अभियान २.० (२०२६)' अंतर्गत जिल्ह्यात दि.१४ ते २३ सप्टेंबर २०२६ या कालावधीत विविध ठिकाणी आरोग्य तपासणी शिबिरांचे आयोजन करण्यात आले. या अभियानांतर्गत एकूण १ हजार २८ आरोग्य शिबिरे घेण्यात आली असून ४३ हजार ९४१ लाभार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली.

यामध्ये २० हजार ३१ महिला, २१ हजार १७० पुरुष आणि २ हजार ७४० बालकांचा समावेश आहे. विविध



आजार व आरोग्यविषयक तक्रारींसाठी नागरिकांची तज्ज्ञ डॉक्टरांकडून तपासणी करून आवश्यक उपचार व मार्गदर्शन करण्यात आले.

अभियानांतर्गत कायचिकित्सा (Medicine) विभागात २३ हजार २५८, इतर विकार विभागात ३ हजार ३२३, बालरोग विभागात १ हजार २१०, अस्थीविकार विभागात ९२८, त्वचारोग विभागात ८३१, हृदयविकार विभागात ७११, स्त्रीरोग विभागात ५६४, कान–नाक–घसा (ENT) विभागात ३३७, नेत्रविकार विभागात १ हजार ४१ आणि शस्त्रक्रिया (Surgery) विभागात ९८ रुग्णांची तपासणी करण्यात आली.

तसेच ६ हजार ८०४ रुग्णांची रक्ततपासणी करण्यात आली. ४४९ रुग्णांची ECG तपासणी, तर १०० रुग्णांना अँजिओग्राफी व इतर आवश्यक तपासण्यांसाठी संदर्भित करण्यात आले. आरोग्यविषयक योजनांचा लाभ नागरिकांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने अभियानात आयुष्मान भारत कार्डासाठी १ हजार ४९६, आभा कार्ड नोंदणीसाठी १ हजार ५१५ आणि गोल्डन कार्डसाठी २४२ लाभार्थ्यांची नोंदणी करण्यात आली.

अभियानांतर्गत आयोजित रक्तदान शिबिरांना नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला असून ४०० रक्तदात्यांनी रक्तदान केले. तसेच २२ नागरिकांनी अवयवदानासाठी लिखित संमतीपत्र दिले. 'श्री गणेशा आरोग्याचा अभियान २.०'च्या माध्यमातून जिल्ह्यातील नागरिकांना त्यांच्या जवळच्या ठिकाणी आरोग्य तपासणी, आवश्यक वैद्यकीय मार्गदर्शन तसेच विविध आरोग्यविषयक योजनांची माहिती व सुविधांचा लाभ उपलब्ध करून देण्यात आला.

## गणेशोत्सवानंतर गावे झाली रिकामी; आता राहिले वयोवृद्ध अन् कुलुपबंद घरे

**तळा : प्रतिनिधी**

तळा तालुका हा डोंगराळ दुर्गम भाग असून येथील नागरिक मोठ्या प्रमाणात मुंबई, नालासोपारा,भाईंदर ,ठाणे,पुणे शहरांकडे नोकरी व रोजगारासाठी स्थलांतर झाली आहेत .

गणेशोत्सव आला की ही चाकरमानी मंडळी गावाकडे मोठ्या प्रमाणात येत असतात.एस.टी, रेल्वे,खाजगी वाहने यांची बुकींग महिनाभर आधी पासून करून नंतर गणेशोत्सवासाठी येण्यास सुरुवात होते.ज्या गावांमधे घरांना कुलपे लागलेली असतात ती कुलपे उघडली जावून गणेशोत्सवात गावे फुल झाल्याचे चित्र पहावयास मिळतात.

गणेशोत्सव,होळीउत्सव या दोन सणांना गावे फुल होतात.मात्र आता १९ सप्टेंबरला गणेश विसर्जन झाल्यानंतर चाकरमानी मंडळी परतीच्या प्रवासाला



लागली व पुन्हा गावे रिकामी झाल्याचे चित्र पहावयास मिळून वयोवृध्द मंडळी राहिली आहेत. गणेशोत्सव या सणाला विशेष महत्व असून चाकरमानी मंडळी न चुकता गावात आली होती. आठ दिवस गावागावातून प्रकाशमय आनंददायी वातावरण निर्माण होऊन.घराघरातून ढोलकीचा आवाज घुमत होता.

गणेशोत्सव हा गावाच्या विकासासाठी चालना देणारा उत्सव ठरत असतो.याकाळावधीत चाकरमानी मंडळी,गावकरी मंडळी व गणेश भक्त यांची गावात एकत्र बसून गावच्या विकासा संबंधी व अडीअडचणींन संबंधी चर्चा करून एक प्रकारे गावाच्या विकासाचा आराखडाच तयार केला जातो

त्याप्रमाणे उपक्रम राबविले जातात.तसेच गावाच्या विकासाची कामे कोणाच्या माध्यमातून होतील यावरतीही चर्चा करून त्याचेही नियोजन केले जाते.आपला गाव आदर्श व स्वच्छ सुंदर असावे ही संकल्पना गावकऱ्यांमध्ये रूजलेली आहे.

तालुक्यात एखादा दुसरा मोठा उद्योग आला तर तालुक्यातील स्थलांतर थांबून व्यवसाय वाढून स्थानिक पातळीवर नागरिकांना रोजगार मिळेल रोजगार उपलब्ध झाला तर येथे नागरिकरण वाढून स्थानिक माणूस येथेच राहील.आता गणेशोत्सव झाल्यानंतर गावे रिकामी झाली असून गावागावात वयोवृद्ध व कुलुप असलेली बंद घरे पहावयास मिळत आहेत.

## मोहोपाड्यात वीज कोसळल्याने विद्युत उपकरणांचे नुकसान

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

मोहोपाडा येथे सायंकाळी विजांच्या कडकडाटासह झालेल्या मुसळधार पावसादरम्यान वीज कोसळल्याने ग्रामस्थांच्या घरातील विद्युत उपकरणांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. ग्रामपंचायत सदस्या रसिका खराडे यांच्या घराजवळ वीज पडल्याने परिसरातील सुमारे १२ ते १३ घरांतील टीव्ही, फ्रीज, पंखे, वायफाय राऊटर, सीसीटीव्ही यंत्रणा यांसह विविध विद्युत उपकरणांचे नुकसान झाले.

सायंकाळच्या सुमारास अचानक विजांचा कडकडाट वाढला आणि मोठ्या आवाजासह वीज कोसळली. त्यानंतर रसिका खराडे यांच्या घरातील वायफाय राऊटरने पेट घेतला, तर सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या डिव्हाईस वायर जळाल्या. प्रसंगावधान राखत घरातील सदस्यांनी तत्काळ आग विझवल्याने मोठा अनर्थ टळला. त्यांच्या घरातील फ्रीज जळाला असून काही पंखेही बंद पडले.

याच घटनेत वैभव खराडे यांचा एलईडी टीव्ही संच जळाला, तर अनिल खराडे यांच्या घरातील दोन सीलिंग फॅनचे नुकसान झाले.शोभा रेपाले दोन फॅन, मनोहर तांडेल यांचा व्हायफाय राऊटर तसेच आसपासच्या परिसरातील ग्रामस्थांच्या विद्युत उपकरणांचे नुकसान झाले.

याशिवाय परिसरातील अन्य ११ ते १२ घरांमधील विविध विद्युत उपकरणांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे सांगण्यात आले.

वीज कोसळण्याच्या घटनेनंतर काही काळ परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाल्याचे वृत्त नाही.दरम्यान, परिसरात विजांचा कडकडाट आणि मुसळधार पाऊस सुरू असतानाही वीजपुरवठा खंडित करण्यात आला नाही, असा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

त्यामुळे अचानक झालेल्या वीजप्रवाहातील बिघाडामुळे विद्युत उपकरणांचे नुकसान झाल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. झालेल्या नुकसानीची पाहणी करून संबंधित विभागाने पंचनामा करावा आणि नुकसानग्रस्तांना योग्य ती मदत मिळावी, अशी मागणी ग्रामस्थ करीत आहेत .

## एक्सप्रेस वेवर कारला अज्ञात वाहनाची धडक; एकाचा मृत्यू

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

मुंबईपुणे द्रुतगती महामार्गावर खालापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत अज्ञात वाहनाने बलेनो कारला पाठीमागून धडक दिल्याने झालेल्या अपघातात कारमधील एका प्रवाशाचा मृत्यू झाला. ही घटना २३ सप्टेंबर रोजी पहाटे सुमारे २.०५ वाजता मौजे माझगाव हद्दीत घडली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी हे त्यांच्या चार मित्रांसह मारुती सुझुकी बलेनो (क्र. GJ–१६–CH–७८९१) मधून मुंबईपुणे द्रुतगती मार्गावरून पुण्याच्या दिशेने लेन क्रमांक २ मधून प्रवास करीत होते.

माझगाव हद्दीतील कि.मी. २३/९०० जवळ आले असता पाठीमागून आलेल्या अज्ञात वाहनचालकाने रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून वाहन अतिवेगाने व बेदरकारपणे चालवून बलेनो कारला पाठीमागून धडक दिली.

या अपघातानंतर अज्ञात वाहनचालक वाहनासह पुण्याच्या दिशेने पसार झाला. अपघातात कारमध्ये मागील बाजूस बसलेले भरतभाई हिम्मत परमार (वय ५१ वर्षे) यांना गंभीर दुखापत झाली. या दुखापतींमुळे त्यांचा मृत्यू झाल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे.

याप्रकरणी खालापूर पोलीस ठाण्यात गुन्हा रजि. नं. ४१९/२०२६ नोंद करण्यात आला आहे. आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम १०६(१),१२५(अ), १२५(ब), २८१ तसेच मोटार वाहन कायदा १९८८ मधील कलम १८४, १३४/१८७ अन्वय गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## वावेघर येथून विवाहित महिलेसह दोन मुले बेपत्ता; अपहरणाचा गुन्हा दाखल

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील वावेघर येथे राहत्या घरातून एका महिलेचे तिच्या दोन मुलांसह अपहरण झाल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी रसायनी पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरुद्ध अपहरणाचा गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, रसायनीतील मौजे वावेघर येथील गणेश मंदिर गल्ली परिसरातील राहत्या घरातून फिर्यादी यांच्या पत्नी व त्यांच्या दोन मुलांना कोणीतरी अज्ञात व्यक्तीने बेकायदेशीररीत्या अपहरण केल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

या घटनेप्रकरणी रसायनी पोलीस ठाणेत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.या प्रकरणाचा पुढील तपास महिला पोलीस नाईक घोलप करीत आहेत.

## रूळ ओलांडताना गाडीचा धक्का लागल्याने मृत्यू

**कर्जत :** कर्जत खोपोली मार्गावरील पळसदरी रेल्वे स्थानकात येण्यासाठी रूळ ओलांडत असलेलया एका प्रवाशाला पुण्याकडून आलेल्या गाडीचा धक्का बसला. या अपघातात त्याचा मृत्यू झाला असून कर्जत रेल्वे पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद झाली आहे.

कर्जत – खोपोली उपनगरीय रेल्वे मार्गावरील पळसदरी स्थानकाजवळ आज सकाळी ट्रॅक ओलांडताना मेल एक्स्प्रेसची धडक लागून एका रेल्वे प्रवाशाचा मृत्यू झाला. वासरे खोंडा परिसरातील शिरसे येथील आदिवासी वाडी येथील सखाराम मारुती हिलम हे पळसदरी स्थानकावरून लोकलने खोपोली येथे नोकरीसाठी जात असतात.

खोपोली लोकल पकडण्यासाठी रूळ ओलांडत असताना पुण्याकडून येत असलेल्या मेल एक्सप्रेस गाडीने सखाराम हिलम यांना धडक बसली. ही घटना पळसदरी प्लॅटफॉर्मपासून सुमारे २०० मीटर अंतरावर घडली. कर्जत रेल्वे पोलिसांनी तातडीने जखमी अवस्थेत असलेल्या हिलम यांना कर्जत उपजिल्हा रुग्णालयात हलवले मात्र डॉक्टरांनी मृत घोषित केले.

## मुंबई–पुणे द्रुतगती मार्गावर खासगी बस जळून खाक; १४ प्रवासी सुरक्षित

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

मुंबई–पुणे द्रुतगती मार्गावर रसायनी पोलीस ठाण्याच्या हद्दीत रिसवाडी गावाजवळ गुरुवारी सकाळी सुमारे ८ वाजण्याच्या सुमारास खासगी बसला अचानक भीषण आग लागल्याची घटना घडली.

बसला अचानक आग लागल्यानंतर काही वेळातच आगीने संपूर्ण बसला वेढले आणि बस पूर्णपणे जळून खाक झाली. प्राथमिक माहितीनुसार, बसमध्ये एकूण १४ प्रवासी होते. आग लागल्याचे लक्षात येताच सर्व प्रवाशांना सुरक्षितपणे बाहेर काढण्यात आले. त्यानंतर त्यांना दुसऱ्या बसमधून पुढील प्रवासासाठी रवाना करण्यात आले.

घटनेची माहिती मिळताच पनवेल महानगरपालिका व खोपोली नगरपरिषद अग्निशमन दलाच्या पथकांसह रसायनी पोलीस घटनास्थळी दाखल झाले. अग्निशमन दलाच्या जवानांनी तातडीने आग विझवण्याचे काम हाती घेतले. सर्व यंत्रणांच्या तत्पर प्रयत्नांमुळे परिस्थितीवर नियंत्रण मिळवण्यात यश आले.आगीत बस पूर्णपणे जळून खाक झाली असली तरी सुदैवाने कोणत्याही प्रवाशाला किंवा अन्य व्यक्तीला इजा झालेली नाही. आग लागण्याचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नसून, रसायनी पोलीसांकडून पुढील तपास सुरू आहे.



### लोणेरे येथे सांस्कृतिक कार्यक्रम आणि विद्वत परिषद

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

सांस्कृतिक कार्य विभाग व सांस्कृतिक कार्य संचालनालय, , मुंबई यांच्यावतीने संत ज्ञानेश्वर माऊली यांच्या ७५० व्या जयंती वर्षानिमित्त डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ लोणेरे, ता.माणगाव येथे शनिवार, दि.२६ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत सांस्कृतिक कार्यक्रम तसेच विद्वत परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे असे कार्यक्रम अधिकारी, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई यांनी कळविले आहे.

## माझे पसंतीचे सिडकोचे घर योजनेतील विजेत्यांना पोर्टलवर नोंदणी करण्याचे आवाहन

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

सिडकोच्या "माझे पसंतीचे सिडकोचे घर" गृहनिर्माण योजनांतील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील ज्याविजेत्या अर्जदारांनी यापूर्वी प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत नोंदणी केलेली नसल्यास, त्यांनी सदर नोंदणी तात्काळ करावी, असे आवाहन सिडकोतर्फे करण्यात येत आहे. ₹२.५० लाखांच्या अनुदानाचा लाभघेण्यासाठी पात्र EWS अर्जदारांनी PMAY अंतर्गत नोंदणी पूर्ण करणे आवश्यक आहे. तसेच, अनुदानाचा लाभघेण्यासाठी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता लवकरात लवकर करणे आवश्यक असल्याचे सिडकोने कळविले आहे.

'माझे पसंतीचे सिडकोचे घर' योजनेतील विजेत्या अर्जदारांनी विहित मुदतीत cidcohomes.com या संकेतस्थळावरील आपल्या Login ID द्वारे आवश्यक कागदपत्रे सादर करावीत.विहित मुदतीत Confirmation Fee भरणे आवश्यक आहे. कागदपत्रे किंवा Confirmation Fee विहित मुदतीत सादर/भरली न केल्यास वाटप केलेली सदनिका रद्द होऊ शकते. ₹२.५० लाखांच्या अनुदानाचा लाभ घेण्यासाठी पात्र EWS अर्जदारांनी केंद्र शासनाच्या PMAY–MIS पोर्टलवरील Beneficiary Attachment प्रक्रिया पूर्ण करावी. यासाठी आधारकार्ड संलग्न करणे अनिवार्यअसून, आवश्यकतेनुसार OTP द्वारे पडताळणी प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी अर्जदारांनी सहकार्य करावे.

**EWS प्रवर्गातील गृहनिर्माण योजनांची ठिकाणे**

१ तळोजा सेक्टर २८ व ३९
२ खारघर बस डेपो सेक्टर १४
३ खारकोपर प्लॉट क्र. २ए व २बी, सेक्टर १६ए
४ कळंबोली बस डेपो सेक्टर १७
५ बामणडोंगरी, उलवे

## सीबीडी बेलापूरमध्ये रविवारी भव्य मोफत महाआरोग्य शिबिर

**नवी मुंबई :** देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता पक्षाच्या वतीने 'सेवा संकल्प अभियान' व 'सेवा मेरा योगदान' उपक्रमांतर्गत सीबीडी बेलापूर येथे भव्य मोफत महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. सध्या शहर परिसरात ताप व त्यासंबंधित आजारांचे रुग्ण वाढत असल्याच्या पार्श्वभूमीवर या शिबिरात नागरिकांची विविध आरोग्य तपासणी करून गरजेनुसार मोफत औषधांचे वाटप करण्यात येणार आहे.

हे महाआरोग्य शिबिर रविवार, २७ सप्टेंबर रोजी सकाळी ९ ते दुपारी २ वाजेपर्यंत सीबीडी बेलापूर सेक्टर–६, मिनाक्षी हॉटेलजवळ आयोजित करण्यात आले आहे. शिबिराचे उद्घाटन आ. मंदा म्हात्रे यांच्या हस्ते होणार आहे.

# राज्योत्सवानिमित्त महापालिकेचा कलागणेश महोत्सव उत्साहात

**नवी मुंबई : बातमीदार**

गणेशोत्सव हा सर्व पिढ्यांना एकत्र आणणारा सण असून या निमित्ताने एकमेकांच्या आनंदात सहभागी होता येते. आजही नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने आयोजित कलागणेश महोत्सवात 'हे गजवदन' हा कार्यक्रम सादर करताना विद्यार्थ्यांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सगळ्या पिढ्यांचे प्रेक्षक समोर होते, त्यामुळे कार्यक्रम करताना विशेष आनंद लाभला, अशा शब्दांत सुप्रसिद्ध संगीतकार–गायक डॉ. सलील कुलकर्णी यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

वाशीचे विष्णुदास भावे नाट्यगृह हे कार्यक्रम करण्यासाठी आम्हा कलावंतांचे अत्यंत आवडते



सभागृह असून नवी मुंबईतील रसिक अतिशय उत्तम असल्याचाही त्यांनी विशेष उल्लेख केला.महाराष्ट्र शासनाच्या आदेशानुसार 'गणेशोत्सव' हा 'राज्य महोत्सव' म्हणून साजरा होत असताना महापौर सुजाता पाटील यांच्या संकल्पनेतून, आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली नवी मुंबई महानगरपालिका क्रीडा व सांस्कृतिक विभागाच्या वतीने 'कलागणेश महोत्सव' या विशेष उपक्रमाचे विष्णुदास भावे नाट्यगृह येथे आयोजन करण्यात आले होते.

याप्रसंगी डॉ. सलील कुलकर्णी यांनी 'सूर नवा ध्यास नवा' फेम गायिका सन्मिता धापटे–शिंदे यांच्यासह 'हे गजवदन...' ही भक्तिगीतांची सुरेल मैफल सादर करून रसिकांची मने जिंकली.

याप्रसंगी क्रीडा, सांस्कृतिक व युवक कल्याण समितीचे सभापती गिरीश म्हात्रे व उपसभापती राजू मढवी, नगरसेवक विशाल विचारे, नगरसेविका संतोषी म्हात्रे व दीक्षा कचरे, क्रीडा विभागाच्या उपायुक्त अभिलाषा म्हात्रे उपस्थित होते.

या कार्यक्रमात भक्तिगीत गायन सुरू असताना चित्रकार सागर जाधव यांनी कॅनव्हासवर श्रीगणेशाची प्रतिमा रेखाटण्यास सुरुवात केली. याचप्रमाणे मूर्तिकार मयुरी ठाकरे व जतिन पाटील यांनी श्रीगणेश मूर्ती बनविण्यास सुरुवात केली. कार्यक्रमाच्या सांगतेप्रसंगी पूर्ण झालेली श्रीगणेशाची चित्राकृती उपसभापती राजू मढवी यांच्याकडे प्रदान करण्यात आली.









**उलवे नोड : गव्हाण ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच विजय घरत यांच्या कोपर येथील निवासस्थानी विराजमान गणरायाचे भाजप ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे, वाय.टी. देशमुख, धीरज ओवळेकर, प्रणय कडू यांनी दर्शन घेतले.**

# स्वच्छता ही सेवा अभियानाला वेग

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

'स्वच्छता में सहभाग, स्वच्छ भारत, विकसित भारत' या संकल्पनेवर आधारित 'स्वच्छता ही सेवा – २०२६' हे विशेष अभियान महापौर नितीन पाटील व महापालिका आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत पालिका क्षेत्रात राबविले जात आहे. या अभियानांतर्गत प्रभाग क्रमांक १ ते २० मध्ये विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती उपायुक्त डॉ. वैभव विधाते यांनी दिली.



या अभियानांतर्गत स्वच्छतेबाबत जनजागृती, सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता मोहीम, जनभागिदारी स्वच्छता अभियान, स्वच्छ पाठशाळा युवा स्वच्छतेसाठी, 'स्वच्छतेतून समृद्धीकडे', सफाई मित्र सुरक्षा, सेवा व सन्मान शिबिर, 'एक दिन, एक घंटा, एक साथ' श्रमदान अभियान आणि 'स्वच्छ भारत दिवस' असे विविध कार्यक्रम आयोजित केले जाणार आहेत.

विविध प्रभागांत स्वच्छता व जनजागृती मोहीम प्रभाग समिती 'अ', 'ब', 'क' आणि 'ड' मधील 'स्वच्छता लक्षित युनिट' (CTU) परिवर्तन अभियानांतर्गत कचरा साचणाऱ्या व दुर्लक्षित ठिकाणांची स्वच्छता, सुशोभीकरण तसेच नागरिकांच्या सहभागातून विशेष स्वच्छता मोहीम राबवण्यात आली.

प्रभाग 'अ' मधील रोडपाली येथील श्री म्हसोबा तलाव (सेक्टर १२) परिसर, नवीन पनवेल मधील कृत्रिम तलाव, प्रभाग 'ब' मधील बेलपाडा विसर्जन घाट, प्रभाग 'अ' मधील रोहिंजण गणेश घाट आणि प्रभाग 'ड' मधील वडाळे व बल्लाळेश्वर तलाव परिसराची स्वच्छता करण्यात आली.

'जनभागीदारी स्वच्छता अभियान' अंतर्गत कामोठे सेक्टर ८ मध्ये घरोघरी जाऊन कचरा वर्गीकरणाची माहिती देण्यात आली. तसेच दुकानदारांना प्लास्टिक बंदीबाबत जागरूक करण्यात आले.

कामोठे येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल (सेक्टर १९) आणि सुधागड एज्युकेशन सोसायटी (कोपरा गाव) येथे विद्यार्थ्यांना स्वच्छतेची शपथ देण्यात आली. या वेळी घनकचरा व्यवस्थापन नियम–२०१६, कचरा वर्गीकरण आणि घरगुती कंपोस्टिंगबाबत मार्गदर्शन करण्यात आले. नाले स्वच्छता व प्लास्टिकमुक्ती रॅली

प्रभाग 'अ' अंतर्गत रोडपाली सेक्टर १५ मध्ये नालेसफाई करण्यात आली. पिसार्वे गावातील धार्मिक स्थळे व कचरा साचणाऱ्या जागा स्वच्छ केल्या.



**पनवेल : त्वचा व केसांचे आरोग्य, आधुनिक सौंदर्योपचार आणि सौंदर्यवर्धक उपचारांच्या 'स्किनॉरिश' या अत्याधुनिक केंद्राचा म्हात्रे ॲक्सिडेंट हॉस्पिटल येथे शुभारंभ करण्यात आला. उद्घाटन सोहळ्यास आमदार प्रशांत ठाकूर, महापौर नितीन पाटील, शिवसेना नेते चंद्रशेखर सोमण, आयुक्त मंगेश चितळे, नगरसेवक परेश ठाकूर, ज्येष्ठ नेते व माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे, भाजप नेते प्रीतम म्हात्रे यांच्यासह पनवेल, नवी मुंबई आणि रायगड परिसरातील डॉक्टर, शल्यचिकित्सक, वैद्यकीय तज्ज्ञ व विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.**

## निवडक

### आसूडगावमधून महिला बेपत्ता

**पनवेल :** आसूडगाव येथील शिवसाई अपार्टमेंटमधून अजिता अतुल बोटे (वय २७) या महिला कोणाला काहीही न सांगता घरातून निघून गेल्या आहेत. त्यानंतर त्या घरी परतलेल्या नसून नातेवाईक व परिचितांकडे शोध घेऊनही त्यांचा ठावठिकाणा लागलेला नाही.या महिलेबाबत कोणाला काही माहिती मिळाल्यास खांदेश्वर पोलीस ठाणे किंवा तपास अधिकारी पो. हवालदार निलेश घरत (मो. ७९७७७७८७४१) यांच्याशी संपर्क साधावा, असे पोलिसांनी आवाहन केले आहे.

### संशयास्पद महिलांबाबत माहितीचे आवाहन

**पनवेल :** करंजाडे आणि वडघर परिसरात काही संशयास्पद महिलांचा समूह फिरत असल्याची माहिती नागरिकांकडून समोर येत आहे. या महिलांपैकी काही जणी घरफोडीच्या घटनांमध्ये सहभागी असल्याचा आरोप करण्यात येत असून पनवेलमधील श्रद्धा स्नेह सोसायटीमध्ये चोरीची घटना घडल्याची माहिती देण्यात आली आहे. त्यामुळे नागरिकांनी अनोळखी किंवा संशयास्पद व्यक्तींच्या हालचालींबाबत सतर्क राहावे. संबंधित महिलांपैकी कोणी आढळल्यास स्वतःहून कारवाई न करता जवळच्या पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा.

### दुचाकीस्वारांनी सोनसाखळी हिसकावली

**पनवेल :** पायी चालत जाणाऱ्या ४९ वर्षीय व्यक्तीच्या गळ्यातील सोनसाखळी हिसकावून दुचाकीस्वार चोरट्यांनी पलायन केल्याची घटना कामोठे येथे घडली. याप्रकरणी कामोठे पोलिस ठाण्यात दोन अज्ञात चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.सुहास पवार पार्थ हॉटेलजवळील रस्त्याने पायी जात होते. त्यावेळी दुचाकीवरून आलेल्या दोघांपैकी एकाने त्यांच्या गळ्यातील सोनसाखळी हिसकावण्याचा प्रयत्न केला.या झटापटीत सोनसाखळीचा अर्ध्यापेक्षा अधिक भाग पवार यांच्या हातात राहिला, मात्र सुमारे पाच ग्रॅम वजनाचा सोन्याचा तुकडा चोरट्यांच्या हाती लागला.

### शटर उघडून मोबाईल फोनची चोरी

**नवीन पनवेल :** रेस्टॉरंटच्या शटरचे लॉक तोडून चोरट्याने आत प्रवेश केला आणि पासष्ट हजार रुपये किमतीचे दोन मोबाईल फोन चोरून नेले. या प्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात २३ सप्टेंबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. आयान हसीन अहमद मलिक हा पनवेल येथे राहत असून तो काम करत असलेल्या नियाज रेस्टॉरंटचे शटरचे लॉक तोडून चोरांनी आत प्रवेश केला. आणि रेस्टॉरंटच्या बिलिंग काउंटरवर असलेले दोन मोबाईल फोन करून नेले.

### दुकानातून १५ मोबाईलची चोरी

**नवीन पनवेल :** मोबाईल दुकानात घरफोडी करत चोरांनी दुकानातील वेगवेगळ्या कंपन्यांचे एक लाख ९३ हजार रुपये किमतीचे मोबाईल चोरून नेले. याप्रकरणी २३ सप्टेंबर रोजी पनवेल शहर पोलीस ठाण्यात चोराविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. १५ सप्टेंबर ते १६ सप्टेंबर दरम्यानच्या रात्री ते सकाळी हितेश पुरी हे काम करत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज चौक, प्रभाकर राजे कॉम्प्लेक्स, पनवेल येथील महालक्ष्मी मोबाईल रिपेरिंग सेंटर मधील मुख्य शटर चोरट्यांनी उचकटला आणि आत मध्ये प्रवेश करून दुकानातील एक लाख ९३ हजार रुपये किमतीचे १५ मोबाईल फोन चोरून नेले. या प्रकरणी पनवेल शहर पोलीस अधिक तपास करत आहेत.

### पाच लाखांची ऑनलाईन फसवणूक

**पनवेल :** लिंक द्वारे मोबाईल हॅक करून पाच लाख वीस हजारांची फसवणूक केल्याप्रकरणी आरोपी विरोधात तळोजा पोलीस ठाण्यात २३ सप्टेंबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. कासिम कादर अली शेख यांच्या मोबाईलवर गाडीचा ट्रॅफिक चलन पडल्याचा मेसेज अनोळखी इसमाने पाठवला. मेसेज मधील लिंक कासिम यांनी ओपन करून पाहिले असता त्या लिंकद्वारे त्यांचा मोबाईल हॅक झाला आणि त्यांच्या बँक खात्यातून पाच ट्रांजेक्शनद्वारे पाच लाख वीस हजार रुपये परस्पर विड्रॉल झाले आणि त्यांची फसवणूक झाली.

### कार्डची अदलाबदल करून फसवणूक

**नवीन पनवेल :** डेबिट कार्डची अदलाबदल करून ५४ हजार आठशे रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी आरोपी विरोधात तळोजा पोलीस ठाण्यात २३ सप्टेंबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. फिर्यादी तबसूम समीर पावणे हे डेबिट कार्ड घेऊन तळजा फेस वन येथील एटीएम मशीन मध्ये पैसे काढण्यासाठी गेले होते. यावेळी अनोळखी इसमाने त्यांना एटीएम मधून पैसे आणि रिसीट काढताना व डेबिट कार्डचा पिनकोड पाहिला आणि हात चलाखीने त्यांच्याकडील डेबिट कार्डची अदलाबदल केली आणि त्याद्वारे ५४ हजार आठशे रुपये काढून तो निघून गेला.

# सीकेटी महाविद्यालयात कौन्सेलिंग सेलतर्फे तीन दिवसीय व्यक्तिमत्त्व विकास कार्यशाळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात दि.८ सप्टेम्बर २०२६ ते १० सप्टेम्बर २०२६ रोजीकौन्सेलिंग सेल च्या वतीनेव्यक्तिमत्त्व विकास कार्यशाळा– " होप " हा कार्यक्रम पार पाडण्यात आला.



यावेळी कौन्सेलिंग सेल तर्फे डॉ. शुभांगी डेरे (मानसोपचारतज्ज्ञ),आणि डॉ.दीपक पाटील(एम.डी. इन कम्युनिटी मेडिसिन), समुपदेशन विभागाचे अध्यक्ष प्रो. डॉ. बी.एसपाटील व समुपदेशन विभागाच्या प्रमुख स्वाती परब उपस्थित होते कार्यशाळेच्या पहिल्या दिवशी "स्टॉप् थिंकिंग, स्टार्ट लिविंग" ह्या विषयावर चर्चा झाली. भूमिका–अभिनयच्या माध्यमातून, नकारात्मक विचार अतिदाट झाल्यावर सकारात्मक पद्धतीने काम करणे कसे कठीण जाते आणि सकारात्मक पद्धतीने काम करताना नकारात्मक विचार कसे फलदायी विचारामध्ये परिवर्तीत करावे हे उदाहरणांद्वारे पटवून दिले.हे नकारात्मक विचार जर कृतीयोग्य व सकारात्मक विचारांमध्ये बदलले, तर मनातील गोंधळ दूर होण्यास मदत होते आणि आपण ठरवलेली उद्दिष्टे पूर्ण करण्याच्या दिशेने पुढे जाऊशकतो. म्हणजेच, योग्य विचार आणि कृतीच्या माध्यमातून आपण अतिविचारांच्या जाळ्यातून बाहेर पडूशकतो.

दुसऱ्या दिवसाच्या सत्रात डॉ. अल्पना वैद्य, सिम्बायोसिस कॉलेज, पुणे येथील मानसशास्त्रविभागाच्या प्रमुख, यांनी "Self–Empowerment" (स्व–सक्षमीकरण) या विषयावर मार्गदर्शन केले.त्यांनी विविध प्रात्यक्षिके, गटचर्चा आणि विद्यार्थ्यांच्या सक्रिय सहभागाच्या माध्यमातून त्यांना स्वतःच्यासामर्थ्यांचा व मर्यादांचा विचार करण्यास प्रवृत्त केले. यासाठी विद्यार्थ्यांचे फिनिक्स पक्षी, गरुड (Eagle)आणि फुलपाखरू (Butterfly) अशा गटांमध्ये विभाजन करण्यात आले. या उपक्रमाच्या माध्यमातूनविद्यार्थ्यांच्या भावभावना, विचारसरणी आणि दैनंदिन जीवनातील कृती यांवर प्रकाश टाकण्यात आला.तसेच, स्वतःमधील सकारात्मक बदल ओळखून त्यांचा विकास कसा करता येईल,यावर चर्चा करण्यातआली.मीडियाचा अतिवापर, जनरेशन Z चे स्वतंत्र विचार आणि कामाचा अतिताण अशा विविध विषयांवरआधारित भूमिकाभिनय अर्थात (Role Play) सादर करण्यात आले. सत्राच्या शेवटी ध्यानधारणेचे (Meditation) सत्र घेण्यात आले. या माध्यमातूनविद्यार्थ्यांना मनःशांती, आत्मभान आणि सकारात्मक विचारसरणी विकसित करण्यास प्रोत्साहन मिळाले.

### जुगारावर कारवाई, सव्वा लाख रुपये जप्त

**नवीन पनवेल :** गुन्हे शाखा कक्ष दोनने जुगारावर कारवाई करत ११ जणांवर कळंबोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला. अमरांते बिल्डिंग, सेक्टर ९, कळंबोली या ठिकाणी जुगार खेळत असल्याची माहिती गुन्हे शाखेला मिळाली. त्यानुसार पोलिसांनी त्या ठिकाणी छापा टाकला. यावेळी अण्णा दादासो सपकाळ (कळंबोली), केशव लक्ष्मण कदम (चेंबूर पूर्व), पाराजी सुदाम वराळ (रोडपाली), किरण पुंडलिक दरे (पडघे), अनिकेत मधुकर महाडिक (वाशी नाका), कादिर बाबू मुजावर (पनवेल), मयूर दत्तात्रय बेल्हेकर (कळंबोली), अरुण सुबराव माने (कामोठे), कृष्णा भीमशंकर कोळी (सोलापूर), दिगंबर हरिप्रसाद सिंग (उत्तर प्रदेश), रुपेश श्रीकांत शेडगे (कळंबोली) यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला. पोलिसांनी या ठिकाणाहून एक लाख २५ हजार रुपये आणि जुगाराचे साहित्य जप्त केले.

## कामोठ्यातील लोकनेते दि.बा. पाटील विद्यालयात कर्मवीर जयंती कार्यक्रम उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेचे लोकनेते दि.बा.पाटील विद्यालय कामोठे मध्ये रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या १३९ वा जयंती सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला.




या कार्यक्रम प्रसंगी रयत शिक्षण संस्थेचे माजी सचिव ,महात्मा फुले ए.एस. सी. कॉलेज पनवेलचे प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर साहेब, स्थानिक सल्लागार समितीचे चेअरमन जयदास गोवारी साहेब, शिक्षणप्रेमी माजी चेअरमन ,रायगड विभाग समन्वय समितीचे सदस्य स्वामी आप्पा म्हात्रे साहेब, सल्लागार समितीचे सदस्य प्रवीण गोवारी, माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष भगवान गोवारी, खजिनदार योगेश परदेशी, डॉ. प्रा. यशवंत उलवेकर, विद्यालयाचे मुख्याध्यापक तथा रायगड विभागाचे विभागीय अधिकारी उपस्थित होते.

प्रास्ताविकात मुख्याध्यापक कोंगेरे यांनी शाळेची शैक्षणिक गुणवत्ता, विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धेत मिळवलेले यश याविषयी माहिती सांगितली. धनश्री जानकर, स्वरांजली खरात, ऋत्विक घोडगे या विद्यार्थ्यांनी कर्मवीर अण्णा विषयी आपले मनोगत व्यक्त केले. गणेश गलांडे यांनी कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या शैक्षणिक क्षेत्रातील योगदाना विषयी माहिती सांगितली. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे रयत शिक्षण संस्थेचे माजी सचिव, पनवेल कॉलेजचे प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर साहेब यांनी कर्मवीरांचे जीवन तत्त्वज्ञान व समता ,संघर्ष, राष्ट्रप्रेम या अण्णांच्या गुणांची ओळख विविध उदाहरणातून दिली. तसेच शाळेतील AI उपक्रम, संगणक शिक्षण,गुरुकुल उपक्रम,सर्व स्पर्धांमधील शाळेचे यश, शाळेची स्वच्छता,शाळेचा टापटी पणा यासर्वांबद्दल सर्व शिक्षकांचे कौतुक केले.

## नागरिकांच्या सूचनेची तत्काळ दखल; सेक्टर ६मधील उद्यानात धूर फवारणी

**पनवेल : वार्ताहर**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पावसाळी वातावरण आणि डेंग्यूच्या वाढत्या प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांच्या सूचनेची तात्काळ दखल घेत नगरसेविका बायजा बबन बारगजे यांच्या पुढाकाराने सिडको गार्डन, सेक्टर ६ येथे महापालिकेच्या वतीने धूर फवारणी करण्यात आली.

गणेशोत्सवानिमित्त नागरिकांशी संवाद साधत असताना सेक्टर ६ येथील सिडको गार्डन परिसरात मोठ्या प्रमाणात डासांचा प्रादुर्भाव झाल्याची तसेच उद्यानालगतच्या नाल्यात डासांची उत्पत्ती वाढल्याची माहिती नागरिकांनी नगरसेविका बायजा बारगजे यांना दिली. नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने तातडीने उपाययोजना करण्याची मागणीही करण्यात आली.

यानंतर बबन बारगजे यांनी पनवेल महापालिकेचे धूर फवारणी निरीक्षक दीपक म्हात्रे यांच्याशी संपर्क साधून तातडीने फवारणी करण्याच्या सूचना दिल्या. त्यानुसार महापालिकेच्या पथकाने संपूर्ण उद्यान परिसरात धूर फवारणी केली.डासांची उत्पत्ती रोखण्यासाठी नागरिकांनी परिसरात पाणी साचणार नाही, याची काळजी घ्यावी तसेच डासांची उत्पत्ती होऊ शकणाऱ्या जागा स्वच्छ ठेवाव्यात, असे आवाहन दीपक म्हात्रे यांनी केले.



दरम्यान, पंचशीला, पंचरत्न, सरोवर सोसायटी, साईनगर तसेच परिसरातील विविध सोसायट्यांमधील नागरिकांनी तातडीने दखल घेत उपाययोजना केल्याबद्दल नगरसेविका बायजा बबन बारगजे यांचे आभार मानले.



**पनवेल : रायझिंग ग्रुप ऑफ कंपनीच्यावतीने गणेशोत्सवानिमित्त श्री सत्यनारायण महापूजेचे आयोजन करण्यात आले. यावेळी आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासह विविध क्षेत्रातील व्यावसायिक, मान्यवर व हितचिंतकांनी सदिच्छा भेट देऊन श्रींचे दर्शन घेतले. कंपनीचे चेअरमन अशोक मोटे, सीईओ लक्ष्मण शेंडे, संचालक सुमित पाटील यांनी मान्यवरांचे स्वागत करून आभार व्यक्त केले.**

## काळसेकर टेक्निकल कॅम्पसमध्ये रोजगार महाकुंभ

**पनवेल :** महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग तसेच जिल्हा कौशल्यविकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, मुंबई शहर यांच्या सहकार्याने अंजुमन–ए–इस्लामच्या काळसेकर टेक्निकल कॅम्पस, न्यू पनवेल येथे 'पंडित दीनदयाळ उपाध्याय विश्वविक्रमी रोजगार महाकुंभ' मंगळवार, २९ सप्टेंबर रोजी सकाळी ९ वाजता AIKTC ऑडिटोरियम येथे होणार आहे. या रोजगार महाकुंभात विविध नामांकित कंपन्या व उद्योगांमार्फत विविध शैक्षणिक पात्रता, कौशल्ये आणि अनुभवांनुसार रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. दहावी, बारावी, पदविका, पदवीतसेच विविध व्यावसायिक व तांत्रिक अभ्यासक्रम पूर्ण केलेले विद्यार्थी व उमेदवार या उपक्रमात सहभागी होऊ शकतात.



**उलवे नोड : पनवेल महापालिकेचे नगरसेवक परेश ठाकूर यांनी भाजप नेते निलेश खारकर यांच्या निवासस्थानी विराजमान गणरायाचे दर्शन घेतले आणि खारकर यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा दिल्या. धीरज ओवळेकर यांच्या बाप्पाचेही त्यांनी दर्शन घेतले. यावेळी जिल्हा परिषद सदस्य निकिता खारकर, पंचायत समिती सदस्य वितेश म्हात्रे आदी उपस्थित होते.**

## संपादकीय

# विश्वासार्हतेशी खेळ

एखाद्या संस्थेत मतभेद असणे हे लोकशाहीचे लक्षण आहे तर मतभेदांनंतरही अंतिम निर्णय प्रक्रिया कायद्याच्या चौकटीत होणे हे संस्थेच्या कार्यक्षमतेचे लक्षण म्हटले पाहिजे. निवडणूक आयोगाविषयीच्या सध्याच्या वादाकडे पाहताना हाच साधा फरक लक्षात ठेवण्याची गरज आहे.

**निवडणूक आयोगावर आरोप करणे हा विरोधकांसाठी आता जणू राजकारणाचा ठरलेला भाग झाला आहे. निवडणुकीत पराभव झाला की मतदारांचा कौल स्वीकारण्याऐवजी ईव्हीएम, मतदारयाद्या आणि निवडणूक आयोगाच्या निष्पक्षतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करायचे, हा पॅटर्न गेल्या काही वर्षांत वारंवार दिसून आला आहे. आता तर निव्वळ एका इंग्रजी दैनिकातील वृत्तात आयोगातील अंतर्गत मतभिन्नतेचा उल्लेख झाल्याने पुन्हा राजकीय वादळ उठवण्यात आले आहे. अर्थात, निवडणूक आयोगासारख्या घटनात्मक संस्थेच्या कामकाजावर प्रश्न विचारण्याचा अधिकार राजकीय पक्षांना आहे. परंतु प्रश्न विचारणे आणि पुराव्याविना गंभीर आरोप करणे यात मूलभूत फरक आहे. संबंधित वृत्तानुसार मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या नेतृत्वाखालील निवडणूक आयोगातील अन्य दोन निवडणूक आयुक्तांनी दहा महिन्यांत विविध निर्णयांवर १४ वेळा आक्षेप नोंदवले आहेत. इथे लक्षात घेण्याजोगी बाब म्हणजे निवडणूक आयोगाने या वृत्तातील नोंदींचे अस्तित्व नाकारलेले नाही. उलट त्यांचे स्वरूप स्पष्ट करताना आयोगाने म्हटले आहे की अशा सूचना, निरीक्षणे आणि मतभिन्नता ही संस्थात्मक निर्णयप्रक्रियेचा सामान्य भाग आहे आणि अंतिम निर्णय एकमतानेच घेण्यात आले आहेत. अंतर्गत मतभिन्नता म्हणजे संस्थात्मक बंड नव्हे आणि मतभिन्नता म्हणजे निर्णयप्रक्रिया बेकायदा ठरते असेही नाही हा यातील महत्त्वाचा मुद्दा आहे. कोणत्याही संस्थेत एखाद्या प्रस्तावावर चर्चा, आक्षेप, सुधारणा आणि त्यानंतर अंतिम निर्णय हीच निरोगी कार्यपद्धती असते. आयोगात प्रत्येक सदस्याला प्रश्न उपस्थित करण्याचा आणि सूचना करण्याचा अधिकार असणे ही संस्थात्मक प्रक्रियेची खूण आहे. मग या नोंदींवरून थेट ‘अदृश्य हात’, ‘षड्यंत्र’ किंवा ‘लोकशाही धोक्यात’ असे निष्कर्ष काढण्याची घाई कशासाठी? विरोधकांनी उपस्थित केलेल्या प्रत्येक प्रश्नाचे उत्तर आयोगाने द्यावे, पारदर्शकता राखावी आणि आवश्यक ते स्पष्टीकरण द्यावे यात दुमत नाही. परंतु त्याचवेळी आरोप करणाऱ्यांनीही पुरावे देण्याची जबाबदारी स्वीकारली पाहिजे. केवळ एखाद्या वृत्तातील अंतर्गत नोंदींच्या आधारे घटनात्मक संस्थेच्या संपूर्ण विश्वासार्हतेवर संशय घेणे योग्य ठरत नाही. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या कार्यपद्धतीवर सातत्याने प्रश्न उपस्थित केले जात असताना एक आंतरराष्ट्रीय संदर्भही दुर्लक्षित करता येणार नाही. अलीकडेच अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारताच्या मतदार ओळखप्रणालीचा उल्लेख करताना ज्ञानेश कुमार यांच्याशी संबंधित संवादाचा संदर्भ दिला आणि अमेरिकेतील निवडणुकांमध्ये वैध फोटो ओळखपत्रांची आवश्यकता अधोरेखित केली. अर्थात परदेशातील एखाद्या नेत्याच्या प्रशंसेमुळे भारतीय निवडणूक आयोगावरील प्रत्येक प्रश्न आपोआप संपतो असा याचा अर्थ नाही. मात्र आपली निवडणूक व्यवस्था आंतरराष्ट्रीय पातळीवर चर्चिली जात असताना, देशांतर्गत राजकारणासाठी तिची विश्वासार्हता सातत्याने संशयाच्या भोवऱ्यात ढकलणे निश्चितच गांभीर्याने विचार करण्यासारखे आहे. लोकशाहीत सत्ताधाऱ्यांना प्रश्न विचारणे जितके आवश्यक आहे, तितकेच लोकशाहीच्या संस्थांवरील जनतेचा विश्वास जपणेही महत्त्वाचे आहे. निवडणूक आयोगाच्या निर्णयांवर तथ्याधारित टीका होऊ शकते. पण सातत्याने पुराव्यांविना आरोपांची राळ उडवून या घटनात्मक संस्थेची प्रतिष्ठा मलिन करण्याचा प्रयत्न थांबला पाहिजे.**

# गणेशोत्सवात शासकीय योजनांचा ‘लोकसंवाद’

महाराष्ट्राच्या सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनात गणेशोत्सवाला अनन्यसाधारण महत्व आहे. लोकसहभाग, सामाजिक एकोपा आणि जनजागृतीची समृद्ध परंपरा लाभलेल्या या उत्सवाला महाराष्ट्र शासनाने ‘राज्य महोत्सव’ म्हणून घोषित केले आहे. या व्यापक लोकसहभागाचा सकारात्मक उपयोग करून शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजना, उपक्रम आणि धोरणात्मक निर्णयांची माहिती समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या वतीने राज्यभर ‘लोकसंवाद–२०२६’ हा विशेष जनजागृती उपक्रम १६ ते २४ सप्टेंबर या कालावधीत राबविण्यात येत आहे.

‘लोकसंवाद’ हा केवळ शासकीय योजनांची माहिती देणारा उपक्रम न राहता नागरिकांशी थेट संवाद, त्यांच्या प्रश्नांना उत्तरे, योजनांचा लाभ घेण्यासाठी आवश्यक प्रक्रियेचे मार्गदर्शन आणि पात्र लाभार्थ्यांना योग्य माहिती उपलब्ध करून देणारा संवादाचा मंच ठरत आहे. सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे, ग्रामपंचायती तसेच नागरिकांची मोठी वर्दळ असलेल्या ठिकाणी आयोजित करण्यात येणाऱ्या या कार्यक्रमांमध्ये संबंधित विभागांचे अधिकारी प्रत्यक्ष उपस्थित राहून नागरिकांशी संवाद साधत आहेत. त्यामुळे शासन आणि नागरिक यांच्यातील संवाद अधिक सुलभ, थेट आणि परिणामकारक होण्यास मदत होत आहे.

‘लोकसंवाद–२०२६’च्या माध्यमातून नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी संबंधित विविध विषयांवर मार्गदर्शन केले जात आहे. कृषी विभागाच्या माध्यमातून शेतकरी सन्मान निधी, पीक विमा, शेततळे आणि कृषी अवजारांसाठीच्या अनुदान योजनांची माहिती देण्यात येत आहे. सहकार विभागाशी संबंधित पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेबाबतही नागरिकांना मार्गदर्शन केले जात आहे. महिला व बालविकास विभागाच्या माध्यमातून मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना, लेक लाडकी योजना, महिला बचत गट तसेच महिलांसाठीच्या उच्च शिक्षणाच्या विविध सवलती याबाबत माहिती देण्यात येत आहे.

आरोग्याशी संबंधित योजनांची माहितीही या संवादाचा महत्त्वाचा भाग आहे. महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना, आयुष्मान भारत, हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे ‘आपला दवाखाना’, मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्ष, मोफत तपासणी व औषधोपचार यांसारख्या सुविधांबाबत नागरिकांना मार्गदर्शन केले जात आहे. त्याचबरोबर विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असलेल्या शिष्यवृत्तीच्या योजनांची माहितीही संबंधित विभागांच्या माध्यमातून देण्यात येत आहे.

युवक आणि रोजगाराच्या दृष्टीनेही ‘लोकसंवाद’ महत्त्वपूर्ण ठरत आहे. कौशल्य विकास प्रशिक्षण, मुख्यमंत्री रोजगार प्रशिक्षण कार्यक्रम, स्वयंरोजगारासाठीच्या कर्ज योजना तसेच ‘बार्टी’, ‘सारथी’ आणि ‘महाज्योती’ यांसारख्या संस्थांच्या विविध योजनांची माहिती युवकांपर्यंत पोहोचविण्यात येत आहे. शिक्षण, सामाजिक न्याय, क्रीडा व युवक कल्याण, पणन आणि अन्य विभागांच्या योजनांबाबतही स्थानिक गरजेनुसार मार्गदर्शन करण्यात येत आहे. यामुळे गणेशोत्सवाच्या निमित्ताने एकाच ठिकाणी विविध क्षेत्रांशी संबंधित शासकीय योजनांची माहिती नागरिकांना मिळत आहे.

आजच्या डिजिटल युगात नागरिकांना शासकीय सेवांचा ऑनलाइन लाभ घेता यावा, यासाठी महाडीबीटी, आपले सरकार, माहितीचा अधिकार आणि सायबर सुरक्षा यांसारख्या विषयांवरही जनजागृती केली जात आहे. योजनांची माहिती मिळाल्यानंतर पुढील प्रक्रिया कशी करावी, आवश्यक कागदपत्रे कोणती, संबंधित विभागाशी संपर्क कसा साधावा, ऑनलाइन अर्ज किंवा सेवांचा वापर कसा करावा, याबाबत प्रत्यक्ष मार्गदर्शन मिळत असल्याने नागरिकांसाठी ‘लोकसंवाद’ अधिक उपयुक्त ठरणार आहे.

या उपक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी विविध विभागांमध्ये समन्वय साधण्यात आला आहे. कृषी, आरोग्य, महिला व बालविकास, शिक्षण, सामाजिक न्याय, सहकार, पणन, कौशल्य विकास, क्रीडा व युवक कल्याण तसेच पोलीस विभागातील अधिकारी स्थानिक पातळीवर आयोजित कार्यक्रमांमध्ये सहभागी होत आहेत. जिल्हा माहिती अधिकारी, विभागीय माहिती अधिकारी आणि संबंधित विभागांचे क्षेत्रीय अधिकारी यांच्या समन्वयातून कार्यक्रमांचे नियोजन व अंमलबजावणी करण्यात येत आहे.

‘लोकसंवाद–२०२६’ची आणखी एक वैशिष्ट्यपूर्ण बाब म्हणजे नागरिकांच्या प्रश्नांना थेट व्यासपीठ उपलब्ध करून देणे. योजनांची माहिती ऐकण्याबरोबरच नागरिकांना आपल्या अडचणी मांडता येत आहेत. पात्रता, अर्ज प्रक्रिया, आवश्यक कागदपत्रे, उपलब्ध सुविधा आणि संबंधित विभागाशी संपर्क याबाबतच्या शंकांचे निरसन अधिकारी करत आहेत. त्यामुळे माहितीपासून मार्गदर्शनापर्यंत आणि मार्गदर्शनापासून सेवांपर्यंतचा प्रवास अधिक सुलभ करण्याचा प्रयत्न या उपक्रमातून होत आहे.


गणेशोत्सवाच्या काळात मोठ्या संख्येने नागरिक सार्वजनिक गणेश मंडळांना भेट देतात. या लोकसहभागाचे प्रभावी माध्यम म्हणून गणेश मंडळांचा उपयोग करून शासकीय योजनांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविण्याची संकल्पना ‘लोकसंवाद–२०२६’मधून प्रत्यक्षात येत आहे. संदर्भातील प्रसिद्धी अहवालांमध्येही विविध जिल्ह्यांतील गणेश मंडळांच्या ठिकाणी नागरिकांशी थेट संवाद साधून योजनांची माहिती आणि मार्गदर्शन करण्यात येत असल्याचे दिसून येते.

गणेशोत्सव हा केवळ श्रद्धेचा आणि उत्सवाचा विषय नसून महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनातील लोकसहभागाचे प्रभावी व्यासपीठ आहे. या लोकसहभागाला शासकीय योजनांच्या जनजागृतीची जोड देत ‘उत्सवातून संवाद, संवादातून माहिती आणि माहितीच्या माध्यमातून योजनांचा लाभ’ ही संकल्पना ‘लोकसंवाद–२०२६’मधून पुढे येत आहे. शासनाच्या योजना कागदोपत्री किंवा कार्यालयीन चौकटीपुरत्या मर्यादित न राहता त्या नागरिकांपर्यंत प्रत्यक्ष पोहोचाव्यात, नागरिकांना त्यांच्या हक्काच्या सुविधा आणि योजनांची माहिती सहज उपलब्ध व्हावी आणि शासन–नागरिक संवाद अधिक सुलभ व्हावा, या उद्देशाने राबविण्यात येत असलेला हा उपक्रम जनजागृतीला लोकसहभागाची प्रभावी जोड देणारा ठरत आहे.

**–वर्षा फडके आंधळे,**
उपसंचालक (वृत्त),
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय

## प्रतिभावान कवी अरुण कोलटकर

अरुण बालकृष्ण कोलटकर हे मराठी, हिंदी व इंग्रजी भाषांत कविता करणारे भारतीय कवी होते. कोलटकरांचा आज स्मृतीदिन आहे. त्यांचा जन्म १ नोव्हेंबर १९३२ रोजी कोल्हापुरात झाला. त्यांचे शालेय शिक्षण तेथील राजाराम माध्यमिक विद्यालयात झाले. मुंबईच्या सर जे.जे.स्कूल ऑफ आर्ट्सचे पदवीधारक असलेले कोलटकर एक उत्तम ग्राफिक्स डिझायनर व जाहिरात क्षेत्रातील अत्यंत यशस्वी कलादिग्दर्शक होते. १९५०–१९६०च्या दशकांत त्यानी लिहिलेल्या कविता या मुंबईतील विशिष्ट बोली मराठीतल्या असून त्यात मुंबईत आलेल्या निर्वासितांच्या व गुन्हेगारांच्या जीवनाचे दर्शन घडते. मराठी आणि इंग्रजी या दोन्ही भाषांत १९५५पासून कविता लिहिणार्या अरुण कोलटकरांची २००२पर्यंत, म्हणजे सत्तेचाळीस वर्षांत ‘जेजुरी’ (१९७६) आणि ‘अरुण कोलटकरच्या कविता’ (१९७७) अशी अवघी दोन पुस्तकं



प्रकाशित झाली होती, मात्र कोलटकर गेले त्या एकाच वर्षात, २००४मध्ये, त्यांची पाच पुस्तकं आली. मराठीत ‘भिजकी वही’ आणि ‘द्रोण’, इंग्रजीमध्ये ‘काला घोडा पोएम्स’ आणि ‘सर्प सत्र’, ‘द पोलीसमन : अ वर्डलेस प्ले इन थर्टिन सीन्स’ या पुस्तकाच्या रूपाने कोलटकरांची रेखाचित्रकार म्हणून नवी ओळख झाली. २००५मध्ये ‘न्यूयॉर्क रिव्ह्यू ऑफ बुक्स’च्या अभिजात पुस्तकांच्या मालेत कोलटकरांच्या ‘जेजुरी’ची आंतरराष्ट्रीय आवृत्ती प्रसिद्ध झाली. त्याच्या पुढल्या वर्षी ‘अरुण कोलटकरांच्या चार कविता’ हे मराठी कवितांचं छोटं पुस्तक आलं. २००९मध्ये प्रासनेच ‘बोटराईड ॲन्ड अदर पोएम्स’ हा इंग्रजी कवितांचा संग्रह काढला. २०१०मध्ये इंग्लंडमधल्या ब्लडॅक्स बुक्सने कोलटकरांचं सुमारे पावणेचारशे पानांचं ‘कलेक्टेड पोएम्स इन इंग्लिश’ प्रसिद्ध केलं. त्यात मराठी कवितांच्या अनुवादांसोबतच त्यांनी संतांच्या कवितांचे केलेले अनुवादही समाविष्ट आहेत. अशा या प्रतिभावान कवीचे २५ सप्टेंबर २००४ रोजी निधन झाले. (साभार : इंटरनेट)



## बदलते तंत्रज्ञान

## तुमचाही फोन हँग अथवा स्लो चार्ज होतो?

आजकाल स्मार्टफोन आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग बनले आहेत. प्रत्येकालाच त्यांचे फोन जास्त काळ सुरक्षित आणि स्वच्छ राहावेत असे वाटते. म्हणूनच, लोक फोन खरेदी करताच स्क्रीन गार्ड आणि बॅक कव्हर बसवतात. बहुतेक लोकांना असे वाटते की कव्हर त्यांच्या फोनला ओरखडे आणि फुटण्यापासून वाचवते, परंतु फार कमी लोकांना माहिती आहे की कव्हर घालण्याचे अनेक तोटे देखील आहेत.



फोन गरम होतो–फोन कव्हरचा सर्वात मोठा तोटा म्हणजे गरम होण्याची समस्या. फोन दबला गेल्याने त्याची उष्णता बाहेर पडू शकत नाही. विशेषतः उन्हाळ्यात, फोन जास्त गरम होतो, ज्यामुळे फोन हँग होणे, स्लो चालणे आणि जलदगतीने बॅटरी संपणे यासारख्या समस्या उद्भवतात.

चार्जिंग समस्या–कव्हर लावून फोन चार्ज केल्याने बॅटरी चार्ज होण्याची गती कमी होते. कारण फोनमधील उष्णता बाहेर पडत नाही, ज्यामुळे तो जास्त गरम होतो. जास्त वेळ असेच सुरू राहिल्यास बॅटरीचे आयुष्य देखील कमी होऊ शकते.

नेटवर्क आणि सिग्नलवर परिणाम–जाड आणि घट्ट कव्हर कधीकधी फोनच्या नेटवर्क अँटेना आणि सेन्सर्सना ब्लॉक करू शकतात. यामुळे वायरलेस नेटवर्क सिग्नल कमकुवत होऊ शकतात आणि कॉल गुणवत्तेवर परिणाम होऊ शकतो. मोबाइल डेटा स्पीड देखील कमी होऊ शकतो.


चुंबकीय कव्हर समस्य–जर तुमचे कव्हर चुंबकीय असेल तर ते GPS आणि कंपास सारख्या घटकांवर परिणाम करू शकते. यामुळे लोकेशन ट्रॅकिंग योग्यरित्या काम करू शकत नाही.

बॅक्टेरियाचा धोका–जर फोन कव्हर चांगल्या दर्जाचे नसेल तर त्यात धूळ आणि बॅक्टेरिया जमा होऊ शकतात. यामुळे फोनच्या मागील पॅनलला नुकसान होऊ शकते आणि स्वच्छतेच्या समस्या उद्भवू शकतात. घाण कव्हरचा दीर्घकाळ वापर आरोग्यासाठी देखील हानिकारक असू शकतो.

फोनची रचना झाकली जाते

आजकाल कंपन्या आकर्षक फोन डिझाइन आणि बॅक पॅनल तयार करतात. दरम्यान, कव्हर घातल्याने फोनचा मूळ लूक आणि फील खराब होऊ शकतो.

# जनसंघाचे अध्यक्ष पं. दीनदयाळ उपाध्याय



### निमित्त


भारतीय जनता पक्ष सहसंस्थापक पंडित दीनदयाळ उपाध्याय यांचा ११ फेब्रुवारीला स्मृतीदिन आहे. पंडित दीनदयाळ उपाध्याय हे एक हिंदुत्ववादी विचारवंत आणि भारतीय राजकारणी होते. त्यांनी हिंदू शब्दाचा अर्थ धर्मानुसार नव्हे तर भारतीय संस्कृतीच्या रुपात सांगितला. पंडित दीनदयाळ उपाध्याय हे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी संबंधित होते. शिवाय भारतीय जनसंघाचे अध्यक्ष होते. त्यांनी राजकारणाशिवाय भारतीय साहित्यात योगदान दिले. त्यांनी लिहिलेल्या सम्राट चंद्रगुप्त नाटक बहुतेकांना आवडले. श्यामाप्रसाद मुखर्जी यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मदतीने भारतीय जनसंघाची स्थापना केली. नागपुरात दीनदयाळ उपाध्याय थाली सुरू करण्यात आली. याचे श्रेय माजी महापौर संदीप जोशी यांना आहे. ही थाली मेडिकल येथील रुग्णाच्या नातेवाईकांना पुरविली जाते. हजारो रुग्णांचे नातेवाईक या थालीचा लाभ घेतात. अशाप्रकारे देशभर दीनदयाळ उपाध्याय यांना मानणारे नागरिक आहेत.

२५ सप्टेंबर १९१६ रोजी उत्तर प्रदेशातील मथुरा जिल्ह्यात दीनदयाळ उपाध्याय यांचा जन्म झाला. वडील भगवती उपाध्याय भारतीय रेल्वे विभागात नोकरीला होते. आई रामप्यारी यांनी त्यांचा सांभाळ केला. पंडित दीनदयाळ यांचे आईवडील धार्मिक होते. दीनदयाळ यांचे आजोबाही रेल्वेमध्ये स्टेशन मास्टर होते. लहानपणीचं त्यांच्या वडिलांचा मृत्यू झाला. सात वर्षांचे असताना आईही आजारपणात गेली. याचा फार मोठा आघात त्यांच्या बालमनावर झाला.

भारतीय जनसंघ पार्टीचे सह–संस्थापक डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांनी १९५१ मध्ये भारतीय जनसंघ पार्टीची स्थापना केली. पंडित दीनदयाळ उपाध्याय हे भारतीय जनसंघ पार्टीचे सह–संस्थापक होते. १९५३ मध्ये श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या निधनानंतर जनसंघाची जबाबदारी दीनदयाळ यांच्यावर आली. सुमारे पंधरा वर्षे संघटन महामंत्री म्हणून काम केल्यानंतर १९६७ मध्ये ते जनसंघाचे अध्यक्ष झाले. ११ फेब्रुवारी १९६८ मध्ये रेल्वे यात्रेदरम्यान दीनदयाळ यांच्या मृत्यूने देश हादरला. त्यांच्या रहस्यमय मृत्यूने काही प्रश्न निर्माण झाले होते. कारण त्यांचा मृतदेह उत्तर प्रदेशातील मगलसराय रेल्वे स्टेशन लाईनवर सापडला होता. दीनदयाळ यांचा मृत्यू नेमका कसा झाला, हे रहस्य अद्याप कायम आहे.

१० फेब्रुवारी १९६८ रोजी संध्याकाळी दीनदयाळ लखनौवरून पटणाला जाण्यासाठी सियालदाह एक्सप्रेसमध्ये बसले होते. त्यांची ट्रेन मध्यरात्री दोन वाजता मुगलसरायला पोहचली. परंतु, तिथं दीनदयाळ नव्हते. ट्रेन आल्यानंतर दहा मिनिटांनी त्यांचा मृतदेह सापडला होता. त्यांच्या हातात पाच रुपयांची नोट होती. त्यांना जौनपूर येथे मध्यरात्री पाहिले गेले होते. त्यांच्या मृत्यूचा तपास सीबीआयने केला. सीबीआयने भरतलाल आणि त्यांच्या सहकाऱ्याला त्यांच्या हत्येच्या आरोपात अटक केली गेली. चोरी केल्यानंतर दीनदयाळ यांना ट्रेनमधून धक्का मारून बाहेर फेकले असावा, असा अंदाज आहे.
(साभार इंटरनेट)

## चित्र रंगवा






## आरोग्य प्रहर

### महिलांना ब्रेन फॉगचा त्रास; हे आहेत उपाय...

वयाच्या चाळीशीचा टप्पा ओलांडल्यानंतर महिलांच्या शरीरात अनेक बदल घडू लागतात. या सगळ्या बदलांमध्ये महिलांना प्रामुख्याने मेंदूशी संबंधित काही बदलदेखील दिसून येतात. या समस्यांपैकी एक समस्या म्हणजेच ब्रेन फॉग. यामध्ये महिलांना अनेकदा छोट्या–छोट्या गोष्टी विसरण्याचा, कामावर लक्ष केंद्रित न होण्याचा आणि सतत थकल्यासारखे वाटण्याचा त्रास होतो. हा काही गंभीर आजार नसला तरी तुमच्या रोजच्या जीवनावर याचा मोठा परिणाम होऊ शकतो.



हार्मोनल बदल, वाढलेला ताण, झोपेची कमतरता आणि लाईफस्टाईलमधील काही सवयी यामागे मोठ्या प्रमाणावर कारणीभूत ठरतात. योग्य काळजी घेतली तर या समस्येवर मात करणे सहज शक्य होते. हा कोणताही आजार नाही, परंतु याकडे दुर्लक्ष केल्यास मेंदूच्या कार्यक्षमतेवर परिणाम होऊ शकतो. ब्रेन फॉगची समस्या असली तरीही घाबरून जाण्याची गरज नाही. काही सोपे उपाय आणि चांगल्या सवयी स्वतःला लावून आपण या समस्येवर नियंत्रण मिळवू शकता आणि मेंदू पुन्हा सक्रिय ठेवू शकता. ब्रेन फॉग म्हणजे नेमकं काय आणि ही समस्या कमी करण्यासाठी नेमकं काय करता येऊ शकत ते पाहूयात.

कोकिलाबेन धीरूभाई अंबानी हॉस्पिटल, नवी मुंबई येथील मानसोपचार तज्ज्ञ डॉ. पार्थ नागदा यांच्या मते, अनियमित झोपेचे वेळापत्रक, रात्री उशिरापर्यंत जागे राहणे, स्ट्रेस, जास्त स्क्रीन टाइम, सोशल मीडियाचा अतिवापर आणि गोड पदार्थ जास्त खाल्ल्याने ब्रेन फॉगची लक्षणे वाढू शकतात.

दररोज सात ते आठ तास झोपण्याची सवय लावा आणि झोपण्याची व उठण्याची वेळ निश्चित करा. आहारात भरपूर फळे, हिरव्या भाज्या, धान्ये आणि ओमेगा–३ फॅटी सिडचा समावेश करा. गोड पदार्थ, अल्कोहोल आणि जंक फूड खाणे संपूर्णपणे टाळा. दिवसभर पुरेसे पाणी प्या, कारण शरीरात पाण्याची कमतरता मेंदूची कार्यक्षमता कमी करते. रोज कमीत कमी ३० मिनिटे चाला किंवा एक्सरसाइज करा, ज्यामुळे मेंदूतील रक्तप्रवाह वाढेल आणि विचार करण्याची क्षमता सुधारेल. अभ्यास किंवा कामाच्या दरम्यान छोटे–छोटे ब्रेक घ्या आणि डिजिटल उपकरणांपासून थोडा वेळ दूर रहा. मेडिटेशन (ध्यान), माइंडफुलनेस किंवा तुमच्या आवडत्या छंदातून स्वतःल थोडा विरंगुळा करण्यासाठी वेळ द्या. जर ही लक्षणे बराच काळ टिकून राहिली किंवा ती वाढत असतील, तर डॉक्टरांचा सल्ला घेणे गरजेचे आहे.

# पुनर्विकासामुळे विखुरलेल्यांना जोडून ठेवलंय बाप्पाने!

**नवी मुंबई : बातमीदार**

पुनर्विकासामुळे घरं दूर गेली, रहिवासी वेगवेगळ्या ठिकाणी वास्तव्यास गेले आणि रोजच्या भेटीगाठीही कमी झाल्या. मात्र, वाशी सेक्टर ९ मधील एकता आणि कैलास सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या रहिवाशांमधील स्नेहबंध आजही कायम आहेत ते गेल्या ३५ते ४० वर्षांपासून सुरू असलेला येथील सार्वजनिक गणेशोत्सवामुळे.

एकता आणि कैलास या दोन्ही सोसायट्यांचा पुनर्विकास गेल्या चार वर्षांपासून सुरू आहे. दोन्ही संस्थांमध्ये मिळून एक हजारहून अधिक कुटुंबे आहेत. पुनर्विकासाच्या प्रक्रियेमुळे सध्या या कुटुंबांना विविध ठिकाणी भाड्याच्या अथवा अन्य निवासस्थानी राहावे लागत आहे. त्यामुळे पूर्वीप्रमाणे शेजारीपाजारी राहण्याची आणि दररोज एकमेकांच्या भेटीगाठी घेण्याची संधी कमी झाली आहे.मात्र, गणेशोत्सवाच्या



काळात ही सर्व कुटुंबे पुन्हा एकदा आपल्या जुन्या परिसरात एकत्र येतात.पुनर्विकास काळातही सोसायट्यांलगतच्या जागेत सार्वजनिक गणेशोत्सव साजरा करण्याची परंपरा यंदाही कायम ठेवण्यात आली आहे.

गणरायाच्या आगमनापासून विसर्जनापर्यंत विविध कार्यक्रमांमध्ये रहिवासी उत्स्फूर्तपणे सहभागी होत आहेत. गणरायाच्या आगमन आणि विसर्जनाची मिरवणूक वाजतगाजत काढली जाते. त्यात आबालवृद्ध मोठ्या उत्साहाने सहभागी होतात. दररोजच्या आरतीसाठी रहिवासी आळीपाळीने उपस्थित राहतात.

गणेशोत्सवाच्या व्यवस्थेतील विविध जबाबदाऱ्याही रहिवासी एकत्रितपणे पार पाडतात. पुनर्विकासामुळे त्यांच्यातील भौगोलिक अंतर वाढले असले, तरी गणेशोत्सवामुळे सामाजिक आणि भावनिक जवळीक कायम राहिली आहे, अशी भावना येथील रहिवाशांकडून व्यक्त केली जात आहे.

दरवर्षी रहिवाशांकडून आपल्या पुनर्विकास प्रकल्पाचे काम लवकर पूर्ण व्हावे, नव्या घरांचा ताबा लवकर मिळावा आणि सर्व कुटुंबांना आपल्या नव्या घरात सुखासमाधानाने वास्तव्य करता यावे, यासाठी प्रार्थना केली जाते.

# वाशीत दुचाकीच्या धडकेत डॉक्टर महिलेचा मृत्यू

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबईतील वाशी येथे मॉर्निंग वॉकसाठी बाहेर पडलेल्या ५६ वर्षीय महिलेचा भरधाव मोटारसायकलच्या धडकेत मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना बुधवारी (२३ सप्टेंबर) सकाळी घडली. या प्रकरणी विक्रोळी येथील १८ वर्षीय दुचाकीस्वाराविरोधात वाशी पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास सुरू आहे.

या अपघातात मृत्यू झालेल्या महिलेचे नाव डॉ . मेघना मधुकर फिस्के (वय ५६) असे आहे. त्या वाशी सेक्टर ७ येथील रहिवासी होत्या. नेहमीप्रमाणे बुधवारी सकाळी त्या आपल्या नातेवाईक प्रीति स्नेहल फिस्के यांच्यासोबत मॉर्निंग वॉकसाठी घराबाहेर पडल्या होत्या.दोघीही जागृतेश्वर मंदिरापासून सागर विहारच्या दिशेने पायी जात असताना सकाळी सुमारे ७.४५ वाजण्याच्या सुमारास सेक्टर ७ मधील मॉडर्न स्कूलसमोरील रस्त्यावर हा अपघात झाला. मागून भरधाव वेगाने आलेल्या मोटारसायकलने मेघना फिस्के यांना जोरदार धडक दिली.

अपघातानंतर त्यांना तातडीने वाशी येथील एमजीएम रुग्णालयात उपचारासाठी नेण्यात आले. मात्र, डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.मेघना फिस्के या सायन रुग्णालय मुंबई येथील त्वचा रोग तज्ञ डॉक्टर आणि प्राध्यापिका होत्या.

# ई-पीक पाहणीसाठी शेतकऱ्यांनी सक्रिय सहभाग घ्यावा

**पेण : प्रतिनिधी**

पेण तालुक्यात ई-पीक पाहणीचे काम प्रभावीपणे व वेळेत पूर्ण करण्याच्या दृष्टीने प्रशासनामार्फत आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे. ई-पीक पाहणीची नोंद अचूक व वेळेत होण्यासाठी शेतकऱ्यांनी या प्रक्रियेत सक्रिय सहभाग घेऊन आपली पीक पाहणी पूर्ण करावी, असे आवाहन उपविभागीय अधिकारी प्रवीण पवार यांनी केले आहे.




ई-पीक पाहणीच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या पीकविषयक नोंदी अद्ययावत होण्यास मदत होते. त्यामुळे संबंधित शासकीय योजना व विविध शासकीय बाबींच्या अनुषंगाने आवश्यक असलेल्या पीक नोंदीच्या दृष्टीने शेतकऱ्यांनी ई-पीक पाहणीचे महत्त्व समजून घेऊन विहित कालावधीत प्रक्रिया पूर्ण करणे आवश्यक आहे.गावपातळीवर ई-पीक पाहणीबाबत जनजागृती वाढविण्यासाठी पोलिस पाटील यांनी आपल्या गावातील शेतकऱ्यांशी संपर्क साधून त्यांना ई-पीक पाहणीची प्रक्रिया व त्याचे महत्त्व समजावून सांगावे. ज्या शेतकऱ्यांना प्रक्रियेत अडचणी येत असतील, त्यांना संबंधित ग्राम महसूल अधिकारी व सहाय्यक यांच्याशी समन्वय साधून आवश्यक मार्गदर्शन व सहकार्य मिळवून द्यावे.तसेच रास्त भाव धान्य दुकानदार, सरपंच व स्थानिक लोकप्रतिनिधींनी देखील ई-पीक पाहणीचे महत्त्व समजून घेऊन आपल्या कार्यक्षेत्रातील शेतकऱ्यांपर्यंत संपर्क साधावा व त्यांच्यामध्ये जनजागृती करावी.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळवीणेत येते की मौजे पोयंजे, तहसील- पनवेल, जिल्हा - रायगड, येथील खाली वर्णन करणेत आलेली शेतजमीन विद्यमान कब्जेदार ओमकार व्ही अय्यर, यांचेकडून आमचे अशिलानी कायम खरेदी घेणेचा व्यवहार ठरविला आहे, महसूल दप्तरी असलेले सदर शेतजमीनीचे वर्णन खालिलप्रमाणे:-

**शेतजमीनीचे वर्णन**

**मौजे पोंयंजे,** तहसील पनवेल, जिल्हा रायगड येथील मे. दुय्यम निबंधक पनवेल यांचे अधीकार क्षेत्रातील.

| गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र | | | आकार |
|---|---|---|---|---|
| | लावणी लायक | पोटखराबा | एकुण क्षेत्र | |
| | हे.आर.प्रती | हे.आर.प्रती | हे.आर.प्रती | रू.पै. |
| ८/१ | १-३०-९० | ०-१५-२० | १-४६-१० या पैकी विक्रीदार यांच्या मालकीचे क्षेत्र ०-१७-२० | ३.०४ |

वरील शेतजमीन / मिळकत या बाबत अन्य कोणाही व्यक्तीचा गहाण, दान, बक्षीस, साठेकरार, फरोक्त, पोटगी, वारसा वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने कोणतेही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी पुराव्या सहीत सदर नोटीस प्रसिध्द झालेपासुन **१५** दिवसाचे आत पोहचतील अश्या खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे रजिस्टर्ड पोष्टाने पाठवाव्यात. वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे असे समजणेत येवुन सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालक यांच्या बरोबर पूर्ण केला जाईल व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : २४/०९/२०२६

**सही/-**
**ॲड. स्वप्निल व्यं. जाधव**
बी.ए.एल.एल.बी.

**कार्यालयीन पत्ता :** गाळा क्र. १५४ महानगरपालिका कॉम्प्लेक्स, तहसीलदार ऑफिसजवळ, दत्त झेरॉक्सच्या वरती, ता. पनवेल, जिल्हा रायगड ४१०२०६.
संपर्क:- ८८८८२७१७५९

**JAWAHARLAL NEHRU PORT AUTHORITY**

## जाहिर सूचना

**जेएनपीए प्रकल्पग्रस्त लाभार्थ्यांना महत्त्वाची सूचना**

सिडको महामंडळामार्फत जेएनपीए प्रकल्पासाठी संपादित जमिनीच्या मोबदल्यात 12.5% योजनेअंतर्गत पात्र लाभार्थ्यांना विकसित भूखंड देण्याच्या अनुषंगाने सन २०१६ ते २०१९ या कालावधीत जेएनपीए लाभार्थ्यांच्या एकूण १९३ संचिकांमधील भूखंड संगणकीय सोडतीद्वारे इरादित करण्यात आलेले आहेत.

सदर भूखंड इरादित होऊन बराच कालावधी उलटूनही संबंधित लाभार्थ्यांमधील परस्पर वाद / मतभेद तसेच लाभार्थ्यांच्या एकत्रिकरणाबाबतच्या अडचणींमुळे अनेक भूखंडांचे अद्याप वाटप अथवा करारानामा होऊ शकलेला नाही.

या अनुषंगाने दिनांक १३.०८.२०२६ रोजी झालेल्या आढावा बैठकीमध्ये सदर बाबत विषय घेण्यात आलेला असून, प्रलंबित प्रकरणांचा निपटारा करून संबंधित लाभार्थ्यांना भूखंड वाटपाची कार्यवाही पूर्ण करण्याच्या दृष्टीने खालीलप्रमाणे अंतिम संधी देण्यात येत आहे :-

१. ज्या जेएनपीए लाभार्थ्यांना विद्यमान एकत्रिकरणामध्ये फेरबदल करावयाचा आहे, अशा लाभार्थ्यांनी परस्पर संमतीने एकत्र येऊन नवीन एकत्रिकरण करण्यासाठी आवश्यक कागदपत्रांसह अर्ज जेएनपीए प्रशासनाकडे सादर करावा.
२. सदर नवीन एकत्रिकरण / फेरबदलाची कार्यवाही या जाहिर सूचनेच्या प्रसिद्धीच्या दिनांकापासून ६ (सहा) महिन्यांच्या आत पूर्ण करणे आवश्यक राहील.
३. नवीन एकत्रिकरण करून तयार झालेल्या संचिकेच्या आधारे संबंधित भूखंडाचे वाटप करून घेण्याची कार्यवाही १ (एक) वर्षाच्या आत पूर्ण करणे संबंधित लाभार्थ्यांवर बंधनकारक राहील.
४. ज्या लाभार्थ्यांना विद्यमान एकत्रिकरणामध्ये कोणताही फेरबदल करावयाचा नाही, त्यांचा पूर्वी इरादित केलेला भूखंड कायम ठेवण्यात येईल. तथापि, विहित कालावधीत भूखंड वाटपाची कार्यवाही पूर्ण करणे आवश्यक राहील.
५. विहित मुदतीत एकत्रिकरणामध्ये फेरबदल करून घेण्याची अथवा भूखंड वाटपाची कार्यवाही पूर्ण न करणाऱ्या लाभार्थ्यांबाबत, इरादित भूखंड रद्द करण्याची कार्यवाही करण्यात येईल.
६. सदर संधी ही प्रलंबित प्रकरणांचा निपटारा करून भूखंड वाटपाची कार्यवाही पूर्ण करण्याच्या उद्देशाने देण्यात येत असून, संबंधित लाभार्थ्यांनी याची गांभीर्याने नोंद घ्यावी.
७. सदर जाहिर सूचनेनुसार विहित मुदतीत कार्यवाही न केल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित लाभार्थ्यांची राहील. याबाबत सिडको महामंडळाची अथवा जेएनपीए प्रशासनाची कोणतीही जबाबदारी राहणार नाही.

सर्व संबंधित जेएनपीए लाभार्थ्यांनी सदर संधीचा लाभ घेऊन आवश्यक ती कार्यवाही विहित मुदतीत पूर्ण करावी.

**जेएनपीए प्रशासन**

वस्तुनिष्ठ बातम्या आणि आकर्षक जाहिरातींसाठी राम प्रहर

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या नोटिसीने कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे वर्णन केलेली स्थावर मिळकत आमचे अशिल **१) श्री. मंगेश रामचंद्र सातामकर आणि २) श्री. अनिकेत रामचंद्र सातामकर** यांनी सदर स्थावर मिळकतीचा खरेदी करण्याचे ठरविले आहे. परंतु सदरहू स्थावर मिळकत ही **१) श्री. जगदीश हरिराम पाल आणि २) सौ. सावित्री जगदीश पाल** यांनी मे. **आस्था डेव्हलपर्स** यांचेकडून विकत घेतली होती. परंतु, **१) श्री. जगदीश हरिराम पाल हे दिनांक ०३/०५/२०२१ रोजी आणि २) सौ. सावित्री जगदीश पाल या दिनांक ३०/०५/२०२२** रोजी मयत झाले आहेत व सदरहू **१) श्री. विनय जगदीश पाल आणि २) श्री. विवेक जगदीश पाल हे १) श्री. जगदीश हरिराम पाल आणि २) सौ. सावित्री जगदीश पाल** यांचे कायदेशीर वारस आहेत व त्यांनी सदरहू सदनिका विक्रीस काढली असून आमचे अशिलांनी सदरहू सदनिका **१) श्री. विनय जगदीश पाल आणि २) श्री. विवेक जगदीश पाल** यांचेकडून कायमस्वरूपी विकत घेण्याचे ठरविले आहे. तसेच कोणाचा काही ताबाकब्जा किंवा काही अधिकार असल्यास कळविण्याकरीता जाहिर नोटीस प्रसिध्द करण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन:—**

**सदनिका/फ्लॅट नं. २०३, दुसरा मजला, क्षेत्र २८.०६ चौ.मी बिल्टअप क्षेत्र, इमारतीचे नाव "आस्था अपार्टमेंट" नोंदणीकृत सोसायटी "आस्था अपार्टमेंट को. ऑप हौसिंग सोसायटी लिमिटेड", गावठाण प्लॉट नं. ११४, सेक्टर-१४, कामोठे जीइएस, नवी मुंबई, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड, पनवेल महानगरपालिका हद्दीतील व सब रजिस्ट्रार साहेब पनवेल, जि. रायगड यांचे अधिकार क्षेत्रातील स्थावर मिळकत**

सदरहू स्थावर मिळकतीबद्दल कोणाचाही दान, गहाण, बक्षिस, फरोक्त, एम.आ.यू, साठेकरार, वारसाहक्क, वचनचिठ्ठी, बयाणा पावती, विकास करार, भूधारक हक्क, मृत्यूपत्र, लीज/भाडेपट्टा, लीन, पोटगी हक्क अगर अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांचे आत खालील सही करणार यांचेकडे प्रथम दर्शनीय कागदोपत्री पुराव्यासह आपल्या हरकती नोंदवाव्यात.

वरील मुदतीत कोणाच्याही हरकती न आल्यास सदरहू मिळकत निर्वेध, निर्दोष व बोजारहीत असल्याचे गृहीत धरुन आमचे अशिल सदर स्थावर मिळकतीचा खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील व आमचे अशिल सदर मुदतीनंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

पनवेल,
दि. — २५/०९/२०२६

**सही/-**
**(सतिश बाळाराम गवते)**
**वकील.**
पत्ता : ऑफिस नं. ६४, तळमजला, सेक्टर-०१, महालक्ष्मी शॉपिंग सेंटर, महालक्ष्मी नगर, नेरे ता. पनवेल, जि. रायगड महाराष्ट्र ४१० २०६, मो. नं. ९१३७५००४५१

## PUBLIC NOTICE

I Vinod Morarji Soni Partner of M/s. Golden Chemical Industries Factory on Plot No.54, Panvel Industrial Co-Operative Estate Ltd., Dist- Raigad, Maharashtra declaired that the Original Share Certificate issued to me No.531 dated 18-11-1986 with the Share Numbers 451 to 460 (10 Shares) of value Rs.100/- each have been misplaced by me and that I have applied to the above society for the issue of duplicate Share Certificate as per the necessary process of law.

Therefore, if any person/persons having any objection to the above assignment may do so within 15 days of this Public Notice. After 15 days no claim on the above assignment will be considered.

Thanking You,

For,
M/s. Golden Chemical Industries

Partner
Vinod Morarji Soni

M/S.GOLDEN CHEMICAL INDUSTRIES
Plot. No,54, Panvel Industrial Co-Operative Estate Ltd., Mumbai-Pune Highway, Panvel-Dist-Raigad 410 206

## PUBLIC NOTICE

Through this Public Notice, all concerned are hereby informed that our clients have decided to enter into and sale transaction with the existing occupant/holder of the agricultural land described below, situated at Village Poyanje, Taluka Panvel, District Raigad.

The details of the said agricultural land as recorded in the Revenue Records are as follows:

DESCRIPTION OF THE AGRICULTURAL LAND
Village Poyanje Taluka Panvel, District Raigad, within the jurisdiction of the Office of the Sub-Registrar, Panvel.

| Gut No. | Hissa No. | Area in R-Sq. Mtr. | Assessment Rs=Ps. |
|---|---|---|---|
| 8 | 1 | 1-46-10 Out of 0.17.20 | 3.04 |

Any person having any mortgage, gift, bequest, lease, tenancy, charge, lien, encumbrance, easement, inheritance right, claim, interest or any other right or title of whatsoever nature in respect of the aforesaid agricultural land/property, is hereby required to intimate the same in writing, along with documentary evidence in support thereof, to the undersigned Advocate within 15 days from the date of publication of this Notice.

Any such objection/claim shall be addressed to the Advocate of the proposed Purchaser by Registered Post A.D. within the aforesaid period.

If no objection or claim is received within the aforesaid period, it shall be presumed that the said property is free from all encumbrances and claims, and the proposed sale transaction shall be completed with the existing owner/holder of the said property. Any claim or objection raised thereafter shall not be binding upon our clients/purchasers, and the same shall be specifically recorded accordingly.

Place: Panvel
Date: 24/09/2026

Sd/-
Adv. Swapnil V. Jadhav
B.A., LL.B.

Office Address :- Gala No. 154, Municipal Corporation Complex, Near Tahsildar Office, above Datt Xerox, Taluka Panvel, District Raigad - 410206.
Contact: 8888271759

## ग्रुप ग्रामपंचयात वडगांव

**कार्यालय : मु. वाशीवली, पो. पातळगंगा, ता. खालापूर, जि. रायगड**

### ई - निविदा सुचना

ग्रुप ग्रामपंचायत वडगांव ग्रामनिधी - सन २०२६/२७ अंतर्गत ग्रुप ग्रामपंचायत वडगांव हद्दीतील मौजे तळवली येथे अंतर्गत नळ पाणी पुरवठा पाईपलाईन टाकणे कामी महाराष्ट्र शासनाच्या http//www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर दिनांक २३/०९/२०२६ रोजी ई-निविदा सुचना प्रसिद्ध केलेल्या आहेत. तरी इच्छुक ठेकेदारांनी/पुरवठादारांनी सदर निविदांच्या तपशीलासाठी व अटी शर्ती साठी सदर वेबसाईटवर प्रसिद्ध केलेल्या निविदा सुचना/जाहिराती पहाव्यात व विहित मुदतीत आपल्या निविदा सादर कराव्यात.

सही/-
श्री. सुहास विष्णु वारे
ग्रामपंचायत अधिकारी
ग्रुप ग्रामपंचायत वडगांव

सही/-
श्री. विनोद चांदोरकर
प्रशासक
ग्रुप ग्रामपंचायत वडगांव

## महाराष्ट्र शासन
### महाड सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड (रायगड)

Email :-mahad.ee@mahapwd.gov.in Ph.No. (02145) 222167

**निविदा सूचना क्रमांक १६ सन २०२६-२७**

कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड, पिन-४०२३०१, दूरध्वनी क्रमांक ०२१४५-२२२१६७ महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदार यांचेकडुन खालील प्रमाणे बी-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग महाड, जिल्हा रायगड, यांनी राखून ठेवला आहे.

| अ.क्र | कामाचे नांव | कामाची अंदाजित किंमत | इसारा / बयाणा रक्कम | ई-निविदा संचाची किंमत | काम पूर्ण करण्याचा कालावधी (पावसाळा धरुन) | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | लाडवली किंजळोली मांचरूण अड्राई शेवते रस्ता प्राजिमा ९५ कि.मी. ०/०० ते ५/०० सुधारणा करणे, तालुका महाड, जिल्हा रायगड | ३१०६१२७०/- | १७५०००/- | २३६०/- | १२ महिने | आवश्यकता नाही |
| २ | भावे किये पदाजी रायाचा कोंड रस्ता प्राजिमा ९४ कि.मी. ६/०० ते १२/०० (३.७५ मी. धावपट्टीचे ५.५० मध्ये रुंदीकरण व डांबरीकरण करणे.) तालुका महाड | २३५२७७५६/- | १५००००/- | २३६०/- | १२ महिने | आवश्यकता नाही |
| ३ | वाकी बु. पडवळवाडी रानवडी आंबेशिवथर ते प्राजिमाला मिळणारा रस्ता प्राजिमा ९१ कि.मी. ११/००० मध्ये छोटया पूलाचे बांधकाम करणे. तालुका महाड, जिल्हा रायगड . | १३७३३४३५/- | १५००००/- | २३६०/- | १२ महिने | आवश्यकता नाही |
| ४ | पोलादपूर काटेतळी नागांव रस्ता प्रा.जि.मा. ६८ कि.मी. ७/५०० ते १०/००० मध्ये सुधारणा करणे. तालुका महाड, जिल्हा रायगड . | ६८०९०४९/- | ६९०००/- | ११८०/- | १२ महिने | चार अ |
| ५ | भोराव सवाद शारवली निगडे रस्ता प्रजिमा ६५ किमी १२/३०० मध्ये छोटया पुलाचे बांधकाम करणे ता महाड जि रायगड | ६३२३९००/- | ६४०००/- | ११८०/- | १२ महिने | चार अ |

**ई निविदेचे वेळापत्रक**

| | | |
|---|---|---|
| १ | निविदासंच डाऊनलोड व ऑनलाईन निविदा सादर करण्याचा दिनांक व वेळ | दिनांक २५.०९.२०२६ (सकाळी १०.०० पासून) ते दिनांक ०५.१०.२०२६ वेळ १८.०० वाजेपर्यंत |
| २ | निविदा पुर्व बैठक | मा. मुख्य अभियंता, सा. बां. प्रादेशिक विभाग कोंकण, मर्झबान रोड, फोर्ट मुंबई यांचे कार्यालयात दिनांक २९.०९.२०२६ वेळ १२.०० वाजता. अ.क्र १ करीता<br>मा. अधीक्षक अभियंता, रायगड (सा.बां) मंडळ, कोकण भवन, नवी मुंबई यांचे कार्यालयात दिनांक २९.०९.२०२६ वेळ १५.०० वाजता. अ.क्र २ ते ३ करीता |
| ३ | ऑनलाईनव्दारे तांत्रिक व आर्थिक देकार उघडण्याचा दिनांक व ठिकाण (शक्य असल्यास) | मा. अधीक्षक अभियंता, रायगड (सा.बां) मंडळ, कोकण भवन, नवी मुंबई यांचे कार्यालयात दिनांक ०७.१०.२०२६ वेळ ११.०० वाजता |

**टिप :-** परिपुर्ण निविदा https//mahatenders.gov.in या संकेतस्थळांवर पाहता किंवा विकत घेता येतील व ऑनलाईन निविदा सादर करता येतील. सदर निविदांचे सविस्तर वेळापत्रक, शुध्दिपत्रके तसेच इतर काही दुरुस्त्या, शर्ती व अटी या वरील संकेत स्थळांवरच पहाता येतील.

जा.क्र.मवि/लेशा/निविदा/३३८८
दिनांक : २३.०९.२०२६

सही/-
( एस. एम. कांबळे)
कार्यकारी अभियंता
सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड

आरओसी-2026-27/क्र-5/सी2974

## जाहीर नोटीस

माझे पक्षकार नामे हिफ्जुर रहेमान शौकत अली नझिर रा. मेंदडी, ता. म्हसळा, जि. रायगड यांनी दिलेल्या अधिकार व माहिती व कागदपत्रानुसार सर्व सदस्य अंजुमन इस्लाम जंजीरा मुरूड, जि. रायगड नोंदणी क्रमांक बी-५७ यांना सूचित करण्यात येते की, सदरहू संस्थेचा वाद मा. महाराष्ट्र राज्य वक्फ न्यायाधिकरण औरंगाबाद, छत्रपती संभाजीनगर, येथे प्रबंलित आहे मा. उच्च न्यायालय मुंबई व मा. वक्फ न्यायाधिकरण यांनी माझे पक्षकारांना व्यवस्थापन करण्याची परवानगी आदेश दि. ०४.११.२०२५ अन्वये देण्यात आलेली आहे, दोन्ही पक्षकारांना आहे तशी स्थीती ठेवण्याबाबत निर्देश दिलेले आहे, तसेच तंतोतंत स्थगिती आदेशाचे पालन करण्याचे मा. उच्च न्यायालय मुंबई येथील आदेशान्वये निर्देशित केलेले आहे, सध्या प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. माझे पक्षकाराला मिळालेल्या माहिती नुसार निसार अहेमद अली बिरवाडकर हे चूकीचे माहिती देवुन व्यवस्थापनात अडथळा, गैरसमज संभ्रम निर्माण करीत आहे व संस्थेमार्फत व्यवस्थापनात असलेल्या शाळेच्या मुख्याधिपकांना धमकीवजा पत्र निर्गमित करीत आहे. सदरहू निसार अहेमद अली बिरवाडकर यांचे हे कार्य मा. उच्च न्यायालय मुंबई यांचे आदेशाची अवमानना आहे व उल्लंघण आहे. तरी निसार अहेमद अली बिरवाडकर यांनी संस्थेमार्फत दिलेल्या निर्देश, आदेश व पत्राची कोणत्याही प्रकारे दखल घेण्यात येवु नये, तसेच संस्थेच्या अधिपत्याखाली असलेल्या अधिकारी, शिक्षक व ईतर कर्मचारी वर्ग यांनी निसार अहेमद अली बिरवाडकर यांच्या निर्देशानुसार कामकाज करू नये, माझे पक्षकारामार्फत संबधीतांवर अवमाननाची कार्यवाही करण्यात येईल, तसेच योग्य ते फौजदारी, दिवाणी कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घेण्यात यावी. माझे पक्षकार हे अंजुमन इस्लाम जंजीरा मुरूडचे कार्यरत जनरल सेक्रेटरी, विश्वस्त या अधिकाराने सदरहू जाहीर सूचना प्रकाशित करीत आहे.

करीता हे जाहीर सूचना.

**सही/-**
**ॲड. पठाण अमजद एस. खान**

कार्यालय: अल-करीम हॉटेलजवळ, चंपा चौक, रोशन गेट रोड, औरंगाबाद - ४३१ ००१. adv_amjadpathan@yahoo.com
मो. ९३७०४२५५६९ / ९०२८०३१४५६


















पनवेल : भाजप प्रदेश चिटणीस आमदार प्रशांत ठाकूर यांनी नवीन पनवेलमधील गणरायांचे दर्शन घेतले. यावेळी पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते.



श्री गणेश मित्र मंडळाचा बाप्पा अर्थात टपालीचा राजा, पनवेल



कर्जत : भाजपचे ज्येष्ठ नेते यशवंत साबळे आणि खोपोलीचे उपनगराध्यक्ष विक्रम साबळे यांनी आमदार महेंद्र थोरवे यांच्या गणरायाचे दर्शन घेतले. सोबत सूर्यकांत देशमुख, मुस्तफा दुस्ते, नईम मुखरी, सुहास वझरकर, काशिनाथ पार्टे,



पनवेल : पंचायत समिती सभापती रंजना वास्कर आणि कुंडेवहाळ ग्रामपंचायत माजी सरपंच सदाशिव वास्कर यांनी भाजप युवा मोर्चा पनवेल तालुका पूर्व मंडळ अध्यक्ष विश्वजीत पाटील यांच्या घरी विराजमान गणरायाचे दर्शन घेतले.



ॲड. पूर्णिमा व गणेश घुगे, आदई, पनवेल

# माणगाव, नेरळ, नागोठण्यात गढूळ पाणीपुरवठा



**माणगाव : बातमीदार**

माणगाव नगरपंचायत हद्दीतील नागरिकांना सध्या मातीमिश्रित गढूळ पाणीपुरवठा होत आहे. याबाबत नगरपंचायतीकडून नागरिकांना माहिती अथवा दवंडी देण्यास विलंब झाल्यानेही नाराजी व्यक्त होत आहे.

याबाबत संबंधित पाणीपुरवठा कर्मचारीवर्गाकडून मिळालेल्या माहितीनुसार सध्या काळनदी तसेच आजूबाजूच्या डोंगर परिसरात जोरदार पाऊस सुरू असल्याने काळनदीचे पाणी तांबडेलाल, चिखलमिश्रित झाले आहे. हे मातीमिश्रित पाणी जॅकवेलमधून उपसा पंपाद्वारे थेट उतेखोल येथील जलशुद्धीकरण केंद्रात आणले जाते. त्यानंतर तुरटी व टीसीएल पावडरचा योग्य वापर करून फिल्टरेशन प्लांटमधील टाक्यांद्वारे पाण्याची शुद्धीकरण प्रक्रिया केली जाते.

शुद्धीकरणानंतर पाणी येथील तीन मोठ्या साठवण टाक्यांमध्ये आणले जाते. त्यानंतर नऊ पाइपलाइनद्वारे तीन पाळ्यांमध्ये दिवसभर नळ कनेक्शनला पाणीपुरवठा केला जातो. माणगावकरांना दररोज जवळपास ३५ लाख लिटर पाण्याचा पुरवठा केला जात असल्याने अधूनमधून उद्भवणारे तांत्रिक अडथळे तसेच विजेचा खंडित किंवा कमी-जास्त दाबाचा पुरवठा यामुळे पाणीपुरवठ्याच्या वेळापत्रकावर परिणाम होतो.

दरम्यान, मातीमिश्रित गढूळ पाण्याच्या समस्येबाबत माणगाव नगरपंचायत पाणीपुरवठा सभापती अजित तार्लेकर यांच्याशी संवाद साधला असता, त्यांनी संबंधित पाणीपुरवठा कर्मचारीवर्गाची नगरपंचायत कनिष्ठ अभियंता आकाश बुवा यांच्या उपस्थितीत उतेखोल जलशुद्धीकरण केंद्रात तातडीची बैठक घेतली असल्याचे सांगितले. या बैठकीत पाणीशुद्धीकरण प्रक्रियेत आवश्यक ती विशेष काळजी घेऊन नागरिकांना पाणीपुरवठा करण्याच्या सूचना कर्मचारीवर्गाला देण्यात आल्या.

दरम्यान, पाणीपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी नगरपंचायतीचा पाणीपुरवठा विभाग सतर्क असून नागरिकांनीही परिस्थिती लक्षात घेऊन पाणी गाळून व उकळून वापरावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

**नेरळ : प्रतिनिधी**

नेरळमध्ये सलग तीन दिवसांपासून गढूळ पाणीपुरवठा होत आहे. ऐन गणेशोत्सवात घराघरात चहासारखे गाळयुक्त पाणी येत असल्याने नागरिकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असून या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) आक्रमक झाला आहे.

राष्ट्रवादी महिला तालुकाध्यक्ष अ‍ॅड. रंजना धुळे यांनी नेरळ ग्रामपंचायत कार्यालयात धडक देत प्रशासक सुजित धनगर यांची भेट घेतली. चार दिवसांत स्वच्छ पाणीपुरवठा सुरू न झाल्यास पाचव्या दिवशी महिलांसह ग्रामपंचायतीवर हंडा मोर्चा काढण्याचा इशारा त्यांनी दिला.




यावेळी शहराध्यक्ष गणेश खराटे, उपाध्यक्ष प्रवीण ब्रह्मांडे, युवक अध्यक्ष रोहन चव्हाण, सचिन मगर, नथुराम बामगुडे आणि नदीम खान उपस्थित होते.

**नागोठणे : बातमीदार**

नागोठणे शहरातील नळांना मातीमिश्रित गढूळ पाणी येत आहे. त्यामुळे दैनंदिन वापरासह आंघोळीसाठीही नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. विशेषतः गृहिणींची मोठी गैरसोय होत असून या अशुद्ध पाण्यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. जांभूळपाडा (ता. सुधागड) परिसरात झालेल्या जोरदार पावसामुळे अंबा नदीत मातीमिश्रित गढूळ पाणी वाहून येत असल्याने त्याचा परिणाम नागोठण्याच्या पाणीपुरवठ्यावर झाला असावा, असा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे, मात्र याबाबत संबंधित यंत्रणेकडून अधिकृत माहिती अद्याप उपलब्ध झालेली नाही.


नागोठणेकरांच्या आरोग्याशी संबंधित हा गंभीर पाणीप्रश्न लक्षात घेता ग्रामपंचायत, संबंधित पाणीपुरवठा विभाग आणि रिलायन्स व्यवस्थापनाने तातडीने हस्तक्षेप करून नागरिकांना स्वच्छ व सुरक्षित पाणीपुरवठा सुरू करावा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.



## खैर द्रवाच्या तस्करीप्रकरणी दोघांना अटक; ४८ लाखांचा मुद्देमाल जप्त

**धाटाव : प्रतिनिधी**

मुंबई-गोवा महामार्गावरून खैर लाकडापासून तयार केलेला द्रव तब्बल ४३५ ड्रममधून विनापास वाहतूक होत असल्याचे उघडकीस आले असून वनखात्याने केलेल्या कारवाईत ट्रकसह सुमारे ४८ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणात उत्तर प्रदेशातील दोन जणांना अटक करण्यात आली.



कोलाड वनपरिमंडळ अधिकारी यांच्या रिपोर्टनुसार ३ सप्टेंबर रोजी पहाटे सुमारे ४ वाजता वनविभागाचे अधिकारी व कर्मचारी मुंबई-गोवा महामार्गावर कोलाड पुलाजवळ रात्रीची गस्त घालत होते. त्यावेळी भिरा-कोलाड फाट्यावर मुंबईच्या दिशेने जाणारा यूपी-७७ एटी ५४५० क्रमांकाचा टाटा ट्रक अडवून तपासणी करण्यात आली. या ट्रकमध्ये खैर लाकडापासून तयार केलेले ४३५ ड्रम खैर द्रव (अंदाजे २९ टन वजनाचा) आढळून आला.

वनखात्याने तक्रारीमध्ये या मालाची अंदाजे किंमत २८ लाख रुपये, तर ट्रकची किंमत २० लाख रुपये अशी नमूद केली आहे. म्हणजेच जप्त मुद्देमालाची एकूण अंदाजे किंमत ४८ लाख रुपये आहे. या प्रकरणी ट्रक चालक इकरार वहिद बेग (वय ३५) आणि रहिम शामीर बेग (वय ४०, रा. दोघेही उत्तर प्रदेश) यांना अटक करण्यात आली.

**टोळीचा संशय**

वनखात्याच्या अहवालानुसार चौकशीदरम्यान आरोपींनी खैर द्रव दापोली येथून कानपूरला घेऊन जात असल्याचे सांगितले. वनखात्याने आरोपींच्या मागे खैर वृक्ष तसेच इतर वृक्षांच्या लाकडाची तस्करी करणारी टोळी असण्याची शक्यता व्यक्त केली आहे.

जप्त केलेल्या मालाचे मालक म्हणून विशाल मालवणकर यांचा उल्लेख रिमांड रिपोर्टमध्ये करण्यात आला आहे. हा माल नेमका कुठून आला, त्यासाठी आवश्यक परवाने होते का आणि तो शासकीय जंगलातील खैरापासून तयार करण्यात आला आहे का याचा तपास वनखात्याने सुरू केला आहे.

## सावरोली विभागातील मंडळांना भजनी साहित्याचे वाटप

**चौक : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषदेमार्फत देण्यात आलेले भजनी साहित्य नुकतेच सावरोली जिल्हा परिषद प्रभाग सदस्य संतोष बैलमारे यांच्या वतीने व सभापती कृष्णा पारंगे यांच्या हस्ते वाटप करण्यात आले.



महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागाकडून राज्यातील भजनी मंडळांना भजन साहित्य खरेदीसाठी भांडवली अनुदान दिले जाते. रायगड जिल्हा परिषदेनेही जिल्ह्यातील भजनी मंडळांना भजनी साहित्य दिले आहे. पारंपरिक भजनी मंडळांना पखवाज, टाळ साहित्य देण्यात आले.

यावेळी खोपोलीचे माजी नगराध्यक्ष सुनील पाटील, पंचायत समिती सदस्य देवयानी देशमुख, प्रमिला पाटील, सरपंच महेश पाटील, रोहिदास पिंगळे, हभप कृष्णा फाटे यांच्यासह वारकरी सांप्रदायामधील मान्यवर, वारकरी, भजनी मंडळी, पंचायत समिती विस्तार अधिकारी शैलेंद्र तांडेल, विनोद चांदोरकर आदी उपस्थित होते.

## संध्या दिवकर यांच्या काव्यसंग्रहाचे प्रकाशन

**धाटाव : प्रतिनिधी**

शिक्षिका ते कवयित्री हा सुरेल प्रवास आहे, तितकाच प्रेरणादायी आह. असेच खूप लिहा, आम्हाला अनेक पुस्तके वाचायला मिळोत, असे उद्‌गार मंत्री आदिती तटकरे यांनी कवयित्री संध्या दिवकर यांच्या पहिल्या श्वेतराज काव्यसंग्रह प्रकाशन सोहळ्यात काढले.

रोहा येथील ज्येष्ठ नागरिक सभागृहात कोमसाप आयोजित या कार्यक्रमास व्यासपीठावर नगराध्यक्ष वनश्री शेडगे, प्रख्यात साहित्यिक एल.बी. पाटील, कोमसापचे जिल्हाध्यक्ष संजय गुंजाळ, गडदुर्ग अभ्यासक सुखद राणे, गझलकार ज्योत्स्ना राजपूत, सभापती रवींद्र चाळके, मयूर दिवेकर, महेंद्र गुजर, संदीप पाटील, रामा म्हात्रे, सिद्धेश लखमदे आदी उपस्थित होते.




प्रास्ताविकात विजय दिवकर यांनी केले. पुस्तक परीचय रायगड भूषण सुखद राणे यांनी केले. श्वेतराज या पुस्तकातील काही निवडक कवितांचे या प्रसंगी वाचन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हेमंत बारटके यांनी केले, तर भारत चौधरी यांनी मानले.

## दीपक जगताप यांची फेरनियुक्ती



**खालापूर : प्रतिनिधी**

व्हॉईस ऑफ मीडिया संघटनेची रायगड जिल्हा आढावा बैठक नुकतीच खोपोली येथील सागर प्लाझा येथे पार पडली. महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष अभिजीत दरेकर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि संकेत घेवारे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत दीपक जगताप यांची संघटनेच्या खालापूर तालुका अध्यक्षपदी सलग तिसऱ्यांदा नियुक्ती जाहीर करण्यात आली.

बैठकीस अभिजित दरेकर, संकेत घेवारे, चंद्रशेखर परब, दीपक जगताप, किशोर साळुंके, सचिन यादव, विलास पाटील, शिवाजी चोरगे, शिवाजी जाधव, प्रवीण कोल्हे, सुधीर देशमुख, सचिन भालेराव यांच्यासह इतर पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

यावेळी चंद्रशेखर परब यांची रायगड जिल्हाध्यक्षपदी आणि किशोर साळुंके यांची खोपोली शहर अध्यक्षपदी नियुक्तीही जाहीर करण्यात आली. सर्व नवनियुक्तांचे उपस्थित पदाधिकारी आणि सदस्यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.



**खालापूर : कलोते मोकाशी आदिवासी गणेशोत्सव मंडळाच्या सार्वजनिक गणरायाचे उपविभागीय पोलीस अधिकारी विशाल नेहुल यांनी दर्शन घेतले. त्यांना सन्मानपत्र देण्यात आले.**



**नागोठणे : पिगोंडे ग्रामपंचायतीचे सरपंच संतोष कोळी आणि रोहा पं.स. सदस्य समृद्धी कोळी यांच्या वेलशेत येथील निवासस्थानी विराजमान गणरायाचे दर्शन पं.स. सभापती विजया पाशिलकर, उपसभापती संजय मांडलूस्कर, गटनेते किसन मोरे, सदस्य जगन्नाथ धनावडे यांनी घेतले.**



**मंगेश साजेकर कामोठे से. ३४**



**रूपेश गोजे, आरिवली, पनवेल**



**विक्रांत भोसले, खालापूर**



**खालापूर : येथील पोलीस ठाण्यात पोलीस बॉईज मित्रमंडळाने प्रतिष्ठापना केलेल्या गणरायाचे पंचायत समितीचे सभापती कृष्णा पारंगे यांनी दर्शन घेतले. सोबत पोलीस अधिकारी व इतर.**






















पनवेल : भाजप प्रदेश चिटणीस आमदार प्रशांत ठाकूर यांनी नवीन पनवेलमधील गणरायांचे दर्शन घेतले. यावेळी पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते.












दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मताले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com